# मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल, २०२२
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष बाविसावे
अंक चौथा

## जागतिक पुस्तक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

पुस्तकं
भेटवतात जगावेगळी माणसं
नेतात हवं तेव्हा हवं तिथं
देतात अनुभूती परकाया प्रवेशाची
रुजवतात नवा काळ नवी तिथी

'पुस्तक', सर्वांत जवळचा मित्र आहे,
नेहमी उपलब्ध असणारा
चांगला सल्लागार आहे
आणि सर्वांत संयमी शिक्षक आहे.

'पुस्तकांशिवाय घर म्हणजे
आत्म्याशिवाय शरीर

'पुस्तकांची सोबत
असते अशी अनमोल
ऊन-वारा पाऊसधारा
ढळत नाही तोल

पुस्तकांचा सहवास'
करतो मेंदूची मशागत
ज्ञानाची सोबत
मिळत जाते अलगद...

## प्रकाशन समारंभ




**'गृहभंग'** कादंबरीच्या प्रकाशनावेळी लेखक डॉ.एस.एल.भैरप्पा, अनुवादक उमा कुलकर्णी, म.सा.प. कार्याध्यक्ष मिलिंद जोशी आणि 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे व्यवस्थापकीय संचालक अखिल मेहता




व.पु. काळे लिखित **'गोफ'** आणि स्वाती चांदोरकर लिखित **'तोड'** या पुस्तकांच्या प्रकाशनावेळी ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे, स्वाती चांदोरकर, विघ्नहर साखर कारखान्याचे संचालक भास्कर घुले, ऊसतोड कामगार आणि 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे व्यवस्थापकीय संचालक अखिल मेहता

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ एप्रिल २०२२ ◆ वर्ष बाविसावे ◆ अंक चौथा

**संपादक**

अखिल मेहता

**संस्थापक संपादक**

शंकर सारडा

**संपादन साहाय्य**

पूजा भडांगे

**अंकाची किंमत १५ रु.**

वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**

दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **प्रकाशन** | १० |
| **साहित्यवार्ता** | १४ |
| **विशेष लेख** | १६ |
| **एक एक पान घडताना...** | २२ |
| **पुस्तक परिचय** | |
| कशीर | २४ |
| अमेरिकेचा न सांगितलेला इतिहास | २६ |
| वेगळ्या वाटेवरचा डॉक्टर | २८ |
| डेस्टिनेशन | ३२ |
| प्लँटोन | ३४ |
| भिंतींना जिभाही असतात | ३८ |
| द ग्रेट तमाशा | ४२ |
| कास्ट मॅटर | ४६ |
| सम्राज्ञी | ५२ |
| कुलामामाच्या देशात | ५६ |
| **दिनविशेष** | ६२ |


संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

## संपादकीय

# 'पुस्तकनामा'चा रे टाहो...!



'उम्बर्तो इको' नावाचे इटलीचे प्रसिद्ध तत्वज्ञ आणि कादंबरीकार त्यांच्या लिखाणाइतकेच पुस्तकप्रेमासाठीही जगप्रसिद्ध होते. ते एकेठिकाणी पुस्तकांविषयी असं म्हणतात की, ''पुस्तकांचा शोध हा मानवी इतिहासात अत्यंत मूलभूत असून आगीच्या आणि चाकाच्या शोधाइतकाच महत्त्वाचा आहे. पुस्तकांशिवायचं जग कसं असू शकतं याची कल्पनाच करवत नाही. ज्याप्रमाणं बघितल्या जाणाऱ्या सिनेमावरून त्या त्या समाजाचं मानसिक वय काढलं जातं, त्याप्रमाणेच समाज कोणतं पुस्तक वाचतो, त्यावरून त्या समाजाचं बौद्धिक वय काढता येऊ शकतं.'' उम्बर्तो यांच्याविषयी अधिक जाणून घेताना काही विशेष नोंदी वाचनात आल्या; त्या अशा की, या लेखकावर त्यांच्या आजोबांचा खूप मोठा प्रभाव होता. जगाविषयी आणि जगण्याविषयीच्या कुतुहलाने त्यांच्या आजोबांना पुस्तकांकडे ओढून आणलं. ते सतत पुस्तकं वाचायचे. त्यांचं वाचनप्रेम इतकं अफाट होतं की, सेवानिवृत्ती घेतल्यानंतरही केवळ वाचन होत रहावं यासाठी ते बुक बाईंडर म्हणून काम करायचे. आजोबांच्या निधनानंतर मात्र बाईंडिंगसाठी आलेली कित्येक पुस्तकं त्यांच्या घरीच पडून राहिली. ही सगळी पुस्तकं एका मोठ्या पेटीत बंदिस्त करून अनेक वर्षं ठेवली होती. उम्बर्तो यांना हाच खजिना सतत खुणवायचा. असंख्य पुस्तकं आणि आजोबांची काही दुर्मिळ पत्रं वाचून

त्यांच्या आयुष्यात कथा, कादंबऱ्यांनी पहिल्यांदा प्रवेश केला. याच पुस्तकांनी त्यांचं पुढचं सगळं जगणं समृद्ध केलं हे वेगळं सांगायला नको. शेकडो दुर्मिळ पुस्तकांनी समृद्ध असलेली त्यांची ही जगप्रसिद्ध लायब्ररी आता त्यांच्या पश्चात बोलोग्ना विद्यापीठात अध्यासनासाठी हलवण्यात आली आहे. उम्बर्तो असोत किंवा wonder library चे शंकर चाफाडकर. यांच्यासारखी अनेक माणसं आहेत जी आपापल्या परीनं आपलं वाचन आणि पुस्तकवेड जपत आहेत.

खरंतर समाजाकडे, संस्कृतीकडे आणि स्वत:कडे बघण्याची एक विशाल खिडकी म्हणजे पुस्तकं. एक अशी खिडकी जी कुणासाठी उघडली तर लगेच उघडेल किंवा कुणासाठी बंद झाली तर कायमची बंद होईल. १९७६ साली पुस्तक प्रकाशनाच्या माध्यमातून अशीच एक विशाल खिडकी आमच्यासाठी उघडून दिली ती श्री. अनिल मेहता यांनी. त्यानंतर सुनील मेहता यांनी त्याच खिडकीतून आंतरराष्ट्रीय स्तरावर मेहता पब्लिशिंग हाऊसच अवकाश विस्तारलं आणि आता आम्हीही त्याच मार्गावर उभं राहून नव्या पुस्तकांची दुनिया समजून घेत आहोत.

येत्या महिन्यातल्या २२ ते २४ तारखेच्या दरम्यान पुन्हा एकदा मराठी सारस्वतांचा मेळा उदगीर येथे जमतोय. मराठी, कन्नड, तमिळ आणि उर्दू भाषिकांच्या या सीमावर्ती भागात हे ९५वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आलं असून प्रसिद्ध लेखक भारत सासणे हे संमेलनाध्यक्ष असणार आहेत. अखिल भारतीय साहित्य संमेलन मराठीत असलं तरीही उदगीर सारख्या बहुभाषिक भागातली लोकसंस्कृती, तिथल्या चार भाषांचा संगम आणि अनेक बोलीभाषांमुळे या संमेलनाला येणारं वेगळेपण हे निश्चितच नोंद घेण्यासारखं असणार आहे. यानिमित्ताने पुन्हा एकदा विविध प्रकाशनांच्या पुस्तकांची देवाण-घेवाण मोठ्या प्रमाणात होईल, ही अत्यंत आनंदाची बाब आहे.

२० मार्च रोजी एस. एल. भैरप्पा आणि उमा कुलकर्णी यांच्या उपस्थितीत 'गृहभंग' या कादंबरीचं प्रकाशन मेहता प्रकाशनाच्या पुस्तक दालनात करण्यात आलं. तसंच वपुंच्या ९० व्या जयंतीचं औचित्य साधून २६ मार्च रोजी व.पु. काळे लिखित 'गोफ' आणि वपुंच्या कन्या स्वाती चांदोरकर लिखित 'तोड' या दोन्ही पुस्तकांचंही प्रकाशन मेहता पुस्तक

दालनात झालं. या दोन्ही प्रकाशन सोहळ्याला अनेक नामांकित मान्यवरांसह प्रेक्षकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या तीन महिन्यात आपल्याकडून विविध विषयांवरील ५० हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यापैकी काही महत्त्वाची म्हणजे 'रेमन मॅगसेसे' पुरस्कारानं सन्मानित केल्या गेलेल्या जलयोद्ध्याची प्रेरणादायी कहाणी सांगणारं, सुरेखा शहा लिखित 'जोहड', `The sage with two horns' या मूळ इंग्रजी पुस्तकाचा लीना सोहोनी यांनी मराठी अनुवाद केलेलं, सुधा मूर्ती यांचं 'दोन शिंगे असलेला ऋषी', ज्येष्ठ वनाधिकारी रवींद्र वानखेडे यांच्या मेळघाटच्या जंगलातील अनुभवकथा सांगणारं; जी. बी. देशमुख लिखित 'कुलामामाच्या देशात', संघर्षाची यशोगाथा सांगणारे आयएएस अधिकारी विजय अमृता कुलांगे लिखित 'आजचा दिवस माझा', विषमतामूलक व्यवस्थेचं परखड परीक्षण करणारं, डॉ. सुरज मिलिंद एंगडे यांचं, प्रियांका तुपे आणि प्रणाली एंगडे अनुवादित 'कास्ट मॅटर्स', बुकर पारितोषिक विजेत्या लेखिका अरुंधती रॉय यांचं, प्रविण अक्कानवरू अनुवादित 'आज़ादी' ही काही महत्त्वाची पुस्तके आहेत. आशा आहे की ही सर्व पुस्तके आपल्या पसंतीस निश्चितच उतरतील. पुस्तक आणि पुस्तक संस्कृती ही समाजशास्त्रीय मूल्यमापनाचं एकक असून त्यांचं अचूक महत्त्व निर्मल वर्मा नावाचे हिंदी कवी एका कवितेत सांगतात की,

'मैं किताबों की शरण में वैसे ही जाता हूँ,
जैसे लोग धुआंधार बमबारी से बचने के लिए
अण्डरग्राउण्ड डेर में जाते हैं!'

पुस्तकांच्या सहवासात तुमचा येणारा प्रत्येक काळ सुरक्षित आणि समृद्ध होत जावो.



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

**डिजिटल अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

***Available on***

play.google.com / store / books

www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**


मेहता पब्लिशिंग हाऊस
BOOK CLUB
टी बुक क्लब
आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
G Pay +91 94223 23039
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx


Find us on
Facebook
https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon | GET IT ON Google Play | Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**

**www.amazon.in**


**play.google.com**

**https://books.apple.com**



**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

## भोवतीच्या वास्तवातूनच घडून येते साहित्याची नवनिर्मिती : डॉ. एस. एल. भैरप्पा




आपल्या आजूबाजूला घडत असलेल्या घटना, प्रसंग आणि व्यक्तिचित्रे यांचे धागे घेऊन लेखक एक संपूर्ण नवीन अशी कलाकृती आपल्या मनाच्या पातळीवर निर्माण करत असतो. भोवती असलेल्या वास्तवाच्या पलीकडे जाऊन कल्पनेने स्वतंत्रपणे एक नवनिर्मिती घडवून त्याचे यथार्थ चित्रण करणे, म्हणजेच लेखकाची नवसृजनात्मक साहित्यकृती.' असे मनोगत थोर कन्नड साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा यांनी पुण्यातील 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या प्रकाशन समारंभात व्यक्त केले. त्यांच्या 'गृहभंग' या मूळ कन्नड कादंबरीचा उमा कुलकर्णी यांनी मराठी अनुवाद केला असून दि. २० मार्च रोजी झालेल्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, अनुवादक उमा कुलकर्णी, प्रकाशक अखिल मेहता आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. एस. एल. भैरप्पा म्हणाले की, 'अनुवाद हा नेहमी एका भाषेतून दुसऱ्या भाषेत झाला तर तो जास्त अस्सल उतरतो. मूळ कन्नड भाषेतील माझे साहित्य अनेक भाषांत अनुवादित झाले आहे. त्यापैकी एखाद्या हिंदी अनुवादावरून ते पुस्तक मराठीत




भाषांतर करण्यापेक्षा तेच जर कन्नडमधून थेट मराठीत आले, तर जास्त प्रभावीपणे पोहचते. उमा कुलकर्णी यांनी माझे मूळ कन्नड लेखन थेट मराठीत आणल्याने ते फारच लोकप्रिय झाले आहे.'

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्रा. मिलिंद जोशी यांनी डॉ. भैरप्पा यांच्या एकूण साहित्याचे समर्पक शब्दांत थोडक्यात वर्णन केले. 'ग्रामीण जीवनाचे विश्वरूप दर्शन घडवणारी महाकादंबरी म्हणून 'गृहभंग'कडे बघावे लागेल आणि भैरप्पा हे भारतीय साहित्यातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व आहे.' असा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी यावेळी बोलताना केला.

अनुवादक उमा कुलकर्णी यांनी यावेळी आपला अनुवादाचा अनुभव सांगितला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'मेहता प्रकाशना'चे अखिल मेहता यांनी कादंबरीच्या प्रकाशनामागची भूमिका विषद केली. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संस्थापक-संचालक आणि अखिल यांचे पिता सुनील मेहता, तसेच उमा कुलकर्णी यांचे पती विरुपाक्ष कुलकर्णी या दोघांचे कोरोना काळात निधन झाल्याचे सांगून त्यांना याप्रसंगी दोन मिनिटे शांतता राखून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योजना यादव यांनी केले, तर मेहता यांच्या हस्ते निमंत्रित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास 'मेहता प्रकाशना'चे संस्थापक अनिल मेहता, विविध लेखक, रसिक वाचक, विविध प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि कन्नड भाषिक, पुणेकर आवर्जून उपस्थित होते.

## पहिल्याच भेटीत प्रेमात पडावे, असे व्यक्तिमत्व म्हणजे वपु : अजय पुरकर

‘पहिल्याच भेटीत प्रेमात पडावे, असे व्यक्तिमत्व म्हणजे व. पु. काळे. मराठीतल्या माझ्या अत्यंत आवडत्या लेखकाच्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात सहभागी होण्याचा योग आला, हे माझे भाग्य आहे. त्यासोबतच त्यांच्या कन्या स्वाती चांदोरकर यांचेही पुस्तक प्रकाशन होत आहे. ही खूप आनंदाची बाब आहे. मेहता प्रकाशनाने हा सुंदर योग जुळवून आणला. आणि मला त्यासाठी निमंत्रित केले म्हणून माझ्यासाठी आजचा दिवस सर्वार्थाने अविस्मरणीय आहे.’ असे मनोगत प्रसिद्ध अभिनेता अजय पुरकर यांनी व. पु. काळे यांच्या ९०व्या जयंतीदिनानिमित्त आयोजित प्रकाशन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध अभिनेत्री आशा काळे होत्या. वपु यांचे ‘गोफ’ तसेच वपुंच्या कन्या स्वाती चांदोरकर यांच्या ‘तोड’ या कादंबरीचे प्रकाशन मेहता प्रकाशन दालनात करण्यात आले. व्यासपीठावर स्वाती चांदोरकर, ऊसतोड कामगारांचे अध्यक्ष आणि विघ्नहर साखर कारखान्याचे संचालक भास्कर घुले व ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे अखिल मेहता उपस्थित होते.

‘पावनखिंड’ या नुकत्याच गाजलेल्या सिनेमातील बाजीप्रभू देशपांडे यांच्या भूमिकेमुळे अतिशय लोकप्रिय झालेले अजय पुरकर हे दूरदृश्य प्रणालीद्वारे या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी प्रश्नोत्तरांच्या




माध्यमातून त्यांनी उपस्थितांशी हृद्य संवाद साधला. त्यात छोटी मुले, शालेय आणि महाविद्यालयीन तरुण सहभागी झाले होते. त्यासंदर्भात बोलताना पुरकर पुढे म्हणाले की, ‘वाचनाची सवय कमी झाल्याने आजच्या तरुणांना आणि लहान मुलांना आपला अभिमानस्पद पराक्रमी इतिहास, चित्रपटाच्या माध्यमातून जास्त प्रभावीपणे पोहचतो आहे. परदेशात इटली, जर्मनी, सिडनी, मेलबर्न अशा ठिकाणी ‘पावनखिंड’चे खास लोकाग्रहास्तव शो प्रदर्शित करावे लागले. सर्वत्र लोकांचा प्रतिसाद उत्साह वाढवणारा असल्याने लवकरच आम्ही पुढचा चित्रपट रसिकांच्या भेटीला घेऊन येत आहोत.’ अशी माहिती देऊन वपुंच्या कथेवरही सिनेमा करण्याचा विचार असल्याचे सांगितले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना आशा काळे यांनी वपुंबरोबर संयुक्तपणे केलेल्या कथाकथन कार्यक्रमाच्या आठवणी जमवल्या. चित्रपट, नाटक यात आजवर इतक्या भूमिका केल्या असूनही कथाकथनाच्या कार्यक्रमांनी मला एक वेगळाच आनंद दिला, त्यासाठी मी वपुंची सदैव ऋणी आहे, अशी कृतज्ञता व्यक्त केली.

स्वाती चांदोरकर यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना ‘तोड’ या आपल्या कादंबरी लेखनाची प्रेरणा उलगडली.

अखिल मेहता, भास्कर घुले, शिरीष रायरीकर, सुरेंद्र नाईक यांनी वपुंच्या आठवणी सांगितल्या. कादंबरीतली पात्र ज्यांच्याकडे पाहून सुचली, असे काही ऊसतोडणी कामगार अकोले येथून कार्यक्रमास निमंत्रित होते. त्यांनीही यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. वपु काळे यांची नात तन्मयी काळे-कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.






## लहानश्या काव्यची मोठी उपलब्धी, १०व्या वर्षी लिहिली भगवद्गीता



लहानपणी मुलांचा वेळ खेळण्यात, टीव्ही बघण्यात मस्ती करण्यात जातो मात्र, उपराजधानीतील लिटल वंडर काव्य अग्रवालने वयाच्या १० व्या वर्षी 'किडटास्टिक' नावाची भगवद्गीता लिहिली आहे. आपल्या पुस्तकात त्याने अगदी सरळ सोप्या भाषेत मांडणी केली असून असे करणारा काव्य हा सर्वात छोटा लेखक ठरलाय. एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये आपला विक्रम नोंदवणाऱ्या छाट्या काव्यच्या कामगिरीने नागपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेलाय.

काव्य हा सेंटर पॉइंट स्कूलचा विद्यार्थी आहे. लहान वयातच भगवद्गीतेबद्दल अधिकाधिक जाणून घेण्याकडे त्याचा कल होता. नंतर त्याने भगवद्गीतेवरील कार्यशाळा पूर्ण केली. ज्यातून त्याला संस्कृत श्लोक शिकण्यास व वाचण्यास अधिक मदत मिळाली. सोबतच, भगवद्गीतेबाबत सखोल माहिती मिळाली. यातूनच त्याने प्रेरणा घेऊन आई-वडील व आजी-आजोबांच्या सहकार्याने किडटास्टिक नावाची भगवद्गीता अवघ्या दोन महिन्यात लिहून काढली.

काव्य जिथे जातो तिथे आपल्यासोबत श्रीकृष्णाची मूर्ती सोबत घेऊन जातो. भगवद्गीता व श्रीकृष्ण यांना काव्य आपली प्रेरणा मानतो. काव्य संस्कृत श्लोक आणि कविताही सादर करतो. तो


योगाचा राष्ट्रीय विजेतादेखील आहे. याशिवाय त्याने बंगाल बोर्डातून शास्त्रीय संगीताची परीक्षादेखील पास केली आहे. त्याचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असून तो उत्कृष्ट वक्तादेखील आहे. आतापर्यंत त्याला २००० पारितोषिकेही मिळाली आहेत. अशा या काव्यने केवळ नागपूरच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचाच मान वाढवला आहे.

## 'कोसला'कार भालचंद्र नेमाडे यांना 'मटा'चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार

अभिनेते तंत्रज्ञांपासून लेखक, गीतकार यांच्याही कलेचा गौरव करणारा मानाचा 'मटा' सन्मान सोहळा नुकताच पार पडला. यंदाचा हा '२२वा मटा सन्मान सोहळा' असून साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या ज्ञानपीठ विजेते भालचंद्र नेमाडे यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊस परिवारातर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !


**नवी संहिता... नवा आशय...**




**भगवद्गीता**

**रूपा पै**

अनुवाद - **लीना सोहोनी**

भगवद्गीतेचे सार...
देई व्यक्तिमत्त्वाला आकार,
भगवद्गीतेची शिदोरी...
आबालवृद्धा उद्धारी

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## विशेष लेख

(५ एप्रिल १९२७ रोजी ज्येष्ठ लेखक व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्म झाला. मराठी साहित्य क्षेत्राला त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाची आठवण म्हणून वाचूया त्यांच्या आत्मकथनातील एक विशेष लेख... )

### खोली : लिहिण्या-वाचण्याची

वयाच्या सतराव्या वर्षी मी लिहायला लागलो. सुरुवातीच्या कथा 'देवा सटवा महार' वगैरे माडगूळच्या घरी कागद भुईवर ठेवून लिहिल्या. माणदेशी माणसांपैकी काही दादरला माधववाडीतल्या खोलीच्या लादीवर. बायकोला रेशनिंग ऑफिसमध्ये नोकरी लागली, तेव्हा तिनं पंधरा रुपयांची एक लाकडी खुर्ची आणि दीड बाय अडीचचं एक टेबल पहिल्या पगारातनं माझ्यासाठी आणून दहा बाय दहाच्या खोलीत मांडलं. लिहायला टेबल लागतं, हे मला तोपर्यंत माहीत नव्हतं.

बावन्न साली पुण्याला आलो. प्रभात रस्त्यावरच्या 'मोहनतारा'त मला अडीच खोल्या मिळाल्या. पुढच्या खोलीत खिडकीशी बसून 'वावटळ', 'बनगरवाडी'चं लेखन झालं. टेबलासमोरच्या खिडकीतून समोरच्या शेतातली विहीर, आंब्याची झाडं, हिरवळ आणि पार पलीकडं निळी-जांभळी हनुमान टेकडी दिसे.

ही जागा सोडून छपन्न साली पुणे-मुंबई रोडला गेलो, तेव्हाही अडीच खोल्याच मिळाल्या. रेल्वेलाईनच्या बाजूची, मागची झोपायची

खोली अधिक मोठी होती. माझं लिहायचं टेबल मी इथल्याच खिडकीशी टाकलं. समोर काही फूट पलीकडे, रेल्वे-रूळ होता. त्यापलीकडं शेतकी कॉलेजचं मोकळं रान होतं. रेल्वेगाड्यांचा आणि समोरच्या मुंबई रोडवरच्या ट्रकगाड्यांचा आवाज टाळण्यासाठी मी बहुतेक लेखन रात्री दहानंतर करी. 'तू वेडा कुंभार' हे नाटक, 'सकाळची पाहुणी', 'जांभळाचे दिवस', 'कोऱ्या कागदांची कहाणी'सारख्या कथा तिथं लिहून झाल्या.

'अ क्ष र' हे माझं आत्ताचं घर बांधून सत्तावीस वर्षं झाली. माधवराव आचवलांनी याचं डिझाइन केलं आहे. घरासंबंधीच्या तुमच्या कल्पना कळवा, असं त्यांच बडोद्याहून पत्र आल्यावर, घरात एका बाजूला माझी अशी एक प्रशस्त खोली, लिहा-वाचायला आणि चित्र काढायला पाहिजेच, असं मी कळवलं. पूर्व दिशेकडे तोंड करून बांधलेल्या ह्या घरात उत्तरेकडील कोपऱ्यात ही प्रशस्त खोली आहे. दार बंद केलं की, मी घरापासून एकटा होतो.

पूर्वेला, उत्तरेला, दक्षिणेला प्रशस्त खिडक्या असल्यामुळं खोलीचा कोणताही कोपरा अंधारा नाही. ह्या खिडक्यांतून उजेड, वारा आत येतो; तसा प्राजक्ताचा, मोहरल्या आंब्यांचा, चाफ्याचा सुरेख सुगंधही येतो.

माझ्या टेबलासमोरील खिडकीतून गुलमोहराच्या डहाळ्या, बोगनवेल, वाहता रस्ता, मोकळ्या प्लॉटपलीकडच्या इमारतीच्या खिडक्या आणि थोडासा आभाळाचा तुकडा दिसतो. पूर्वी समोर बैठा बंगला होता. अलीकडं अपार्टमेंट झालं आहे. पण अजूनही माझ्या खोलीत उन्हं रांगतात.

पूर्वी माझ्या घराच्या उजव्या बाजूला पेरूच्या गर्द बागा होत्या. काळी शेतं होती. आंबा, सावर, जांभूळ ही झाडं होती. आजही उत्तरेकडच्या मोठ्या खिडकीतून चाफा, प्राजक्त, आंबा, पेरू, रामफळ अशा झाडांचा गच्च हिरवा विस्तार दिसतो. त्यांच्या खोडांवरची ऊन-सावल्यांची कलमकारी दिसते. डहाळ्यांची कुजबुज कानांवर पडते.

बुलबुल, मैना, दयाळ, पोपट, कोकिळ, शिंपी, भारद्वाज अशी अठरापगड जातींची पाखरं घराभोवतीच्या झाडाझुडपांतून सतत हिंडतात. त्यांचे मंजूळ आवाज टेबलाशी बसल्यावर मला ऐकू येतात. आंब्यावरची खार झाडाखाली आलेल्या मांजरावर तोंड टाकत असते, तेही मला ऐकू येतं.

ह्या खोलीच्या दारातून आत आलं की, डाव्या बाजूला पुस्तकांसाठी

भिंतभर लाकडी मांड आहे. उभट चौकोनी असे कोनाडे काढून, कुठं कोनाड्याची पाठ पुढं घेऊन, तर कुठं तळ वीतभर पुढं काढून सागवानी फळ्यांच्या या मांडाला एरवी आली असती, ती एकसुरी चाल वारंवार बदलली आहे. रंगीबेरंगी पाठीच्या ह्या कोनाड्यांतून मला फुलदाण्या, क्युरिओ, अँटिक्स मांडता येतात.

फुलात नेक्टर भरला असताना सावरीचं किंवा वडफळं पिकून लालबुंद झाल्यावर वडाचं झाड पक्ष्यांना आवडावं, तसा हा मांड मला आवडतो. यात माझ्या आवडत्या लेखकांची पुस्तकं आहेत. चित्रकारांची चित्रं-चरित्रं आहेत. वेगवेगळे ज्ञानकोश, शब्दकोश आहेत. गॅझेटिअर्स आहेत. पुस्तकं ठेवताना मी काहीही शिस्त पाळलेली नाही. बर्टनच्या शेजारी लोकमान्य टिळक, आगरकर, राजवाडे, कौटिल्याच्या शेजारी तुकाराम, म्हाइंभट, दामोदर कोसांबी, कुंचला आणि लेखणी सारख्याच कौशल्यानं चालवणारा पीटर स्कॉट, प्रेटर, सलीम अली. उपनिषद्संग्रहाशेजारी रायटर्स ॲट वर्कचे सात व्हॉल्यूम्स, काणे यांच्या धर्मशास्त्राच्या इतिहासाला लागून हेन्री डेव्हिड थोरो आणि पांगारकर. त्यांच्या शेजारी भालचंद्र नेमाडे, शेल्लर, मॅक्सवेल, थर्बर, बर्टन, दोस्तोव्हस्की, आयर्विन स्टोन, बाशम, हरमन हेस, ब्रेख्त, गोविंदराव तळवळकर, ऑर्वेल, मर्ढेकर, जी.ए., गंगाधर गाडगीळ, किपलिंग, विल ड्युरांट, हिरोडोटस, सिसेरो, होमर.

महाराष्ट्रातले, भारतातले आणि देशोदेशीचे लेखक, कवी, नाटककार, विचारवंत, प्रवासी, चित्रकार, शिल्पकार, निसर्गअभ्यासक, तत्त्वज्ञ, समीक्षक, प्राणिशास्त्रज्ञ, पक्षिशास्त्रज्ञ, संशोधक यांचा केवढा तरी स्तब्ध मेळावा ह्या माझ्या खोलीत आहे. शिवाय, ओरिसामधल्या चिल्का सरोवरात स्थलांतरित पक्षी यावेत, तसे पुण्यातील ब्रिटिश लायब्ररी, मॅक्समुल्लर भवनामधून ग्रंथ येत-जात असतातच. कधी व्हर्जिनिया वुल्फ, तर कधी बी. ट्रव्हेन. कधी थेसिगर, तर कधी गुस्ताव्ह क्लीम.

आता समोरच्या रस्त्यावरची रहदारी वाढल्यामुळं धुरोळा खिडकीतून येतो आणि पुस्तकांवर बसतो. मला धूळ रोज झटकावी लागते. हा मांड कुंभारमाश्यांना घरं घालायला आणि पालींना वस्ती करायलाही सोइस्कर आहे. जिंकलेल्या देशातल्या वास्तूंचा जेत्यांनी करावा, तसा कुंभारमाश्यांच्या मातीच्या घरांचा नाश मी निर्घृणपणे करीत आलो आहे. प्राणिशास्त्रावरील

पुस्तकांच्या रांगांमागे मला एकवार पालीची चवळीएवढी दोन अंडीही दिसली होती आणि इतिहासपूर्व काळाचे अवशेष मिळावेत, तसा पालीचा एक सांगाडाही सापडला होता. ह्या सरपटणाऱ्या जीवाचा अंत बहुधा ज्ञानाच्या भाराखाली झाला असावा.

मी वेळोवेळी केलेल्या प्रवासाच्या काही दृश्य आठवणीही मांडातल्या कोनाड्यांतून आहेत. बुद्धाचा चकचकीत पितळी मुखवटा – हा मी अबूला भुतानी विक्रेत्याने रस्त्याकडेला मांडलेल्या दुकानातून घेतला. याचा चेहरा मंगोलियन वाटतोच. उभ्या कोनाड्यात ब्रॉन्झचा लक्ष्मी-विष्णूचा अतिशय ललित अशा पोझमधला पुतळा आहे. हा मी मद्रासला मिळवला. दोन किलो वजनाचा ब्रॉन्झचा एक दशभुजा गणपती आहे. ह्याच्या वामांगी शक्तिरूप स्त्री बसलेली आहे, आणि यांची सोंड उजवीकडे वळलेली आहे. हा एकोणीसशे त्रेसष्ट साली मी एका फिरत्या सिंधी अँटिक विक्रेत्याकडून घेतला होता. गणपतीसारखं संपन्न आणि आगळं रूप असलेला आपला दुसरा देव नाहीच.

पेन्सिली, पेनं ठेवायला म्हणून मी एका जाडजूड तांब्याच्या पंचपात्राचा उपयोग करतो. हेही बहुधा दक्षिणेकडच्या कोणा धर्मपरायण माणसाच्या संध्येच्या पळीपंचपात्रांपैकी असावं. याच्यावर सुरेख नक्षीकाम आहे. चार इंच रुंद तोंडाचं आणि चार इंच उंचीचं हे पूजेच्या भांड्यापैकी भांडं माझ्या लेखनाची, रेखाटनाची साधनं – कात्री, डिंकाची ट्यूब, लहान वस्तू मोठी करून दाखवणारं भिंग – असल्या वस्तू सामावून घेण्याइतकं उदार आहे.

माझे मित्र, शिल्पकार भाऊ साठे यांनी खास मला म्हणून भेट दिलेलं एक बोकडाचं शिल्प आहे. ह्याची उभं राहण्याची ऐट जगज्जेत्याची आहे. ही त्याच्या फनगळ्या शिंगांतून, हातभर दाढीतून, ताठ पायांतून, उडवलेल्या शेपटातून दिसते. हा अजापुत्र कधीही कोणा देवापुढं बळी जाणार नाही, असं वाटतं. बोकडाचं दोंद उठून दिसावं, म्हणून पाठीच्या कण्याला भाऊनं जे वळण दिलं आहे, ते अभिजात आहे. शिल्पकाराची शैली स्वच्छ सांगणारं, असं!

खोलीतल्या उंचावरच्या आडव्या खिडकीच्या फरशीवर मी काही अश्मयुगातील अवजारं, हत्यारं ठेवली आहेत. पुण्याजवळची वेताळ टेकडी आणि पैठणच्या गोदावरी नदीचा काठ हिंडताना मला ही सापडली आहेत. माझ्या लिहायच्या खोलीला या अश्मयुगीन हत्यारांमुळं काही वेगळं परिमाण

लाभावं, असा माझा अंत:स्थ हेतू आहे. शिवाय 'खोली' या शब्दाला आणखी एक अर्थ आहे; तोही विसरला जाऊ नये, हे सदैव ध्यानी राहावं.

खोलीत एकच एक जलरंगांतील मोठं निसर्गचित्र आहे. मला हे चित्र फारच मराठी वाटलं, म्हणून श्री. दिवाकर डेंगळे यांच्या चित्रप्रदर्शनात ते विकत घेतलं आहे.

निळ्या-काळ्या पाण्यानं भरलेलं तळं. त्यात गुरं धुण्यासाठी आलेला तांबड्या मुंडाशाचा शेतकरी. पाण्यात शिरलेली गुरं. काठावर शंकराचं देऊळ. उन्हं खात उभा राहिलेला त्याचा कळस. नंदीपाशी झळकफळक लुगड्यांतील बायांची गर्दी. देवळापासून अंतर राखून उभी मुसलमानी तुर्बत. पडकं बांधकाम. दगडी संध्यामठ. इथं-तिथं बाभळी, निंबाची हिरवीगार झाडं. त्यांच्या सावलीत बसलेली दोघं. मागे निळे डोंगर आणि वर ढग भरलं विस्तीर्ण आभाळ. हा महाराष्ट्र!

माझं लिहायचं टेबल चकचकीत, शिसवी रंगाचं आहे. त्यावर बाभळीच्या लाकडातून कोरून केलेला ट्रे. हा कशाला? तर, दुसऱ्या खोलीतून पुस्तकं हाताशी आणायला आणि वाचनात असलेली पुस्तकं हाताशी ठेवायला. हा लायब्ररी-ट्रे, पाचगणीला राहून सुतारकामाची शाळा चालवणाऱ्या एका अमेरिकन माणसानं मला करून दिला आहे. एक बाजू काढून टाकलेल्या लघुरूप पाळण्यासारखा त्याचा कातीव आकार आहे. घरभर पळणारी पुस्तकं पुन्हा जाग्यावर आणायला हा कामाला येतो.

सुरुवातीपासूनच मी शेफरचं वजनदार, सोनेरी टोपणाचं पेन लिहायला वापरतो. आपली शब्दांची ओळ नांगराचा तास जमिनीतून जावा, तशी असावी म्हणून. अद्यापही एक ठोस शेफर माझ्यापाशी आहे.

कागद ठरावीक आकाराचे. सनलिट बाँड. ह्यात दोनशे शब्द मावतात, म्हणून ते वापरतो. कधी कोरे, कधी आखीव.

लिहिताना अडलो की, काळ्या शाईच्या पेननं पांढऱ्या बाँड पेपरवर रेखाटनं करतो. बैठक टिकते. रात्री निजानीज झाली, म्हणजे माझं लिहिणं सुरू होतं, ते जमेल तिथपर्यंत. पुष्कळदा तीन वाजतात. गृहस्थाला लेखनासाठी हीच एक वेळ उपलब्ध असते, अशी माझी खात्री झाली आहे. ह्या काळात दरवाज्यावरची बेल वाजत नाही. फोन येत नाही.

मी रोज लिहीत नाही. सुचेल, तेव्हा मात्र लागोपाठ बसतो. सगळेच लेखक आळशी असतात. लेखन टाळण्याकडेच त्यांचा कल असतो. माझंही तसंच आहे. कुणाचा जबरदस्त दबाव आला, म्हणजेही मी लिहितो.

अलीकडे मला वाटतं की, लेखन ही फार मेहनतीची गोष्ट आहे. अंदमानात 'कोलू' पिसण्याइतकी.

लिहिताना धूम्रपान, तंबाखू मला पूर्वी लागत असे. आता लिहिणं हा एकच कैफ पुरा असतो. लहानपणापासूनच आहे, ती लोळता-लोळता वाचण्याची सवय अजून टिकून आहे. ह्या खोलीत एक दिवाण आहे. लोड, उश्या आहेत. बसून, लोळून, या अंगावरून त्या अंगावर होत वाचावं. कंटाळा आला की, छातीवर उघडं पुस्तक ठेवून घोरावं.

लिहायच्या खोलीचा कधीमधी मी स्टुडिओही करतो. फ्रेंच बनावटीचं घडीचं इझेल मी अभ्यासिकेत उभं करतो. हे मी लॉस एंजलिसला घेतलं. त्यावर कॅनव्हास बोर्ड लावतो. लिहा-वाचायची खोली टर्पेंटाईन, लेन्सेड ऑइल्सच्या वासानं भरून जाते. महिना, दोन महिने, तीन महिने... इझेल इथंच खडं असतं. पक्षी, पोर्ट्रेट्स रंगविली जातात.

नवी वाचायची पुस्तकं आली, काही लिहावं – असं डोक्यात आलं की, त्याची घडी होते आणि दुसऱ्या खोलीत रवानगी होते.

कधीमधी गावातले, परगावचे जिवलग मित्र फार दिवसांनी जमतात, तेव्हा हीच खोली मैफलीची होते. हसण्या-खिदळण्यानं, चर्चेनं गाजत राहते.

महदाईसा लखुबाईसांसी महावाक्याचिया गोष्टी करीत असताना श्री चक्रधरस्वामींनी सांगितलं आहे की,–

'महावाक्य गोष्टी रानीवनी कीजेति की गा....'

यावर महदाईसा बोलली, ''हो का, जी : चुकलिएं.''

पण रानोवनीच कराव्यात, अशा महावाक्य गोष्टीसुद्धा आम्ही मित्र ह्या खोलीतच करतो.

– व्यंकटेश माडगूळकर

('गोष्ट एका लेखकाची' या आत्मचरित्रातून साभार)

## एक एक पान घडताना...

–अनिल मेहता



*(श्री. सुनील मेहता यांनी प्रकाशन संस्थेची सगळी जबाबदारी स्वीकारल्यानंतरच मेहता पब्लिशिंग हाऊसचं नवं पर्व सुरु झालं. त्यांनी हा प्रवास निवडण्यापूर्वी श्री. अनिल मेहता यांनी सांगितलेल्या काही महत्वाच्या गोष्टी जाणून घेऊया पुढील लेखात...)*

८.

### 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चं नवं पर्व

आज मेहता पब्लिशिंग हाऊस ही मराठीतील सर्वात मोठी म्हणता येईल अशी संस्था आहे. याची सुरुवात साधारण १९७६ साली झाली. पण मेहता पब्लिशिंग हाऊसचं नवं पर्व १९८६ पासून सुनीलपासून सुरू झालं असं मला वाटतं.

त्यावेळी सुनीलचं पुण्यातील बी.एम.सी.सी. कॉलेजमध्ये नुकतंच बी. कॉम. पूर्ण झालं होतं आणि मी सुनीलला विचारलं, 'तू पुढं आता काय करायचं ठरवलं आहेस? आणखी शिक्षण घेणार आहेस की व्यवसाय करणार आहेस?' तर त्यानं 'मी व्यवसाय करणार' असं सांगितलं. तशीही त्याला पुस्तक व्यवहाराची आवड निर्माण झाली होतीच. सुनील ज्या-ज्या वेळी सुट्टीत कोल्हापूरला यायचा त्या-त्या वेळी तो कॅशकाऊंटरवर बसायचा. त्यामुळं पुस्तकं कुठून येतात, कशी येतात त्याला माहिती होतं. दुकानातील कोणतं पुस्तक कुठं आहे, दुकानात

आलेल्या गिऱ्हाईकांशी कसं वागावं, ते कसे कसे असतात हे त्याला व्यवस्थित माहीत झालं होतं. दुकानाविषयी त्याच्या मनात आत्मीयता होती. त्यामुळं मला तो व्यवसाय करणार म्हटल्यावर आनंद झाला. मी त्याला पुण्यातील मेहता पब्लिशिंग हाऊसची जबाबदारी घ्यायला सुचवलं. पण सुनील अजब पुस्तकालयात रमला होता. मी त्याला पुण्याला जायला सांगेन अशी त्यानं कल्पनाच केली नव्हती. त्याला कोल्हापुरात राहून व्यवसाय सांभाळण्याची इच्छा होती. तसं त्यानं मला स्पष्टपणे सांगितलंही. पण माझ्या पत्नीनं अंजलीनं त्याला समजावलं, 'पुण्याला तुझ्यासाठी त्यांनी धाडस केलंय. तुला जायलाच हवं. वडिलांना मदत करणं हे पहिलं कर्तव्य आहे. तुझं शिक्षण पुण्यात झालंय. त्यामागंही तू पुढं-मागं पुण्यात स्थायिक होशील आणि प्रकाशन व्यवसायात मदत करशील अशीच कामना होती.'


मी त्याला एकच विचारलं, 'पुण्यात व्यवसाय सुरू केला आहे, तर तो कोण सांभाळणार?' मी त्याला जाणीव करून दिली, की 'ही जबाबदारी पुढं तू सांभाळायला हवीस. आम्ही भावंडांनी हे जे उभं केलंय ते पुढे नेणं हे तुझं कर्तव्य आहे.' मग त्यानं धाडस केलं. ऑगस्ट १९८६ला सुनीलनं पुण्यातील व्यवसाय हाती घेतला. वर्षभराचं व्यवस्थित नियोजन करून त्याला मी प्रशिक्षण द्यायला सुरूवात केली. कागद कोणकोणत्या प्रकारचा असतो, त्याच्या किंमती कशा असतात, तो कुठून येतो. प्रिंटिंग कसे करतात, हे सारं मी त्याला सांगितलं. पाच–सहा प्रिंटिंगवाल्यांशी त्याची ओळख करून दिली. त्याला त्यांनी प्रिंटिंगमधील सर्व गोष्टी समजून घेण्याकरता चांगली मदत केली.

त्यावेळी पुण्यातील ऑफिसात दोन साहाय्यक कर्मचारी होते. पहिले पंधरा दिवस रोज रात्री सुनील मला फोन करायचा. मी जे सांगेल त्याच्या नोट्स घ्यायचा. त्याचा अभ्यास करून ते प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करायचा. यातून आपण हा व्यवसाय चांगल्या प्रकारे करू शकू, असा विश्वास त्याला वाटू लागला. एकदा पुण्यात आल्यानंतर आपल्या संभाषणाचा तू कसा उपयोग केलास, याबद्दल मी त्याला विचारलं. त्यानं सांगितलं की प्रश्न पडला, की मी नोट्स बघतो, त्याचं उत्तर सापडतं. हळूहळू त्याचा आत्मविश्वास वाढत गेला. त्यावेळी मी त्याला एकच सांगितलं होतं की, 'व्यवसाय करताना आपली सचोटी कधीही सोडायची नाही. आपलं नाव खराब होईल असं काही करायचं नाही.'

माझ्या पुणे - कोल्हापूर फेऱ्या सुरूच होत्या.

(क्रमश:)

## पुस्तक परिचय




# वूलर

कन्नड लेखिका

**सहना विजयकुमार**

अनुवाद

**उमा कुलकर्णी**

*धगधगत्या काश्मीरचं अंतर्गत कोलाहल मांडणारी, सखोल अभ्यासांती लिहिलेली सहना विजयकुमार यांची उमा कुलकर्णी यांनी अनुवादित केलेली विलक्षण कादंबरी*

काश्मीरच्या धगधगत्या होमकुंडाला कथात्म साहित्यात गुंफत ही कादंबरी देशातला एक महत्त्वाचा विषय कुशलतेने हाताळते. एके काळी भारतीय संस्कृतीचं समृद्ध स्थळ असलेलं काश्मीर तेजोहीन होऊन आज म्लेंछ धर्मापुढे का शरणागत झालं आहे, या तपशिलाचा शोध ही कादंबरी घेते. बशीर अहमद, त्यांचा मुलगा अन्वर, ड्रायव्हर सलीम यांसारखी धर्माच्या सीमा ओलांडू पाहणारी पात्रं, पुरातन वेदान्तात आजच्या समस्येवरचं उत्तर शोधणारे हृदयनाथ पंडित; काश्मीर सोडून जम्मूला आलेल्या बांधवांना लुटणारे हिंदू घरमालक, अशा अमानवी परिस्थितीत दांपत्य-जीवनाची फरपट होत असतानाही दांपत्य-जीवनातलं मूल्य जपणारे संजीव आणि आरती कौर अशा पात्रांच्या माध्यमातून काश्मीर नव्याने समजत जातो.


**नवी संहिता... नवा आशय...**


सांगाती ...स्मरणझुला एका जिप्सीचा

**सदानंद कदम**




साहित्यापासून संगीत-नाट्य-कलांपर्यंत, इतिहासापासून गडकोटांपर्यंत अनेक क्षेत्रांतील दिग्गज रणजित देसाई, शिवाजी सावंत, कॅप्टन लक्ष्मी सेहगलांपासून पद्मजा फेणाणींपर्यंत अनेक प्रतिभावंतांचं जिव्हाळपण अनुभवलेल्या आणि ते शब्दबद्ध केलेल्या हरफनमौला सदानंद कदम यांची विलक्षण स्मरणयात्रा..

**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# अमेरिकेचा न सांगितला गेलेला संक्षिप्त इतिहास

**ऑलिव्हर स्टोन । पीटर कुझनिक**

अनुवाद

**प्रशांत तळणीकर**

*जागतिक महासत्ता म्हणून मिरवणाऱ्या अमेरिकेच्या इतिहासाची काळी बाजू मांडणारं, अमेरिकेच्या अज्ञात इतिहासाची पोलखोल करणारं पुस्तक*

तुम्हाला जो इतिहास आपल्याला माहीत आहे असे वाटत होते, तो पुन्हा एकदा तपासून पाहा.

थक्क करणाऱ्या माहितीपट मालिकेचा दिग्दर्शक ऑलिव्हर स्टोन आपला आवाज सहजगत्या पडद्यावरून पुस्तकाच्या पानांवर उतरवतात. मार्मिक छायाचित्रे, खिळवून ठेवणारी वर्णने आणि अज्ञात कागदपत्रे यांनी युक्त असलेले हे माहितीपट मालिकेतले कथन, स्टोन आणि विख्यात इतिहासकार पीटर कुझनिक यांच्या, 'द अनटोल्ड हिस्टरी ऑफ द युनायटेड स्टेट्स'चे एक संक्षिप्त रूप सादर करते. अमेरिकेच्या अपवादात्मकता-वादाच्या प्रचलित, रूढ मतांना हे आव्हान देते आणि अमेरिका तिच्या लोकशाही मूल्यांपासून किती दूर गेली आहे हे दाखवते, तसेच आपल्याला पुन्हा मार्गावर आणण्याकरता ज्यांनी संघर्ष केला त्या प्रबळ शक्तींचे दर्शन घडवते.

* न्यू यॉर्क टाइम्सच्या सर्वाधिक खपाच्या पुस्तकांच्या यादीतील पुस्तक


**नवी संहिता... नवा आशय...**




# खाकी फाइल्स


**नीरज कुमार**

माजी पोलीस आयुक्त, दिल्ली पोलीस

अनुवाद - **रोहन टिल्लू**

अंध:कारमय गुन्हेगारी अंतरंग आणि पोलिसी धैर्याची पराकाष्ठा यांचं मिश्रण असणाऱ्या, आयपीएस नीरज कुमार यांच्या कारकिर्दीतल्या अविस्मरणीय घटनांचा मागोवा

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# वेगळ्या वाटेवरचा डॉक्टर

■

**डॅमियन ब्राऊन**

अनुवाद : **मंजूषा मुळे**

■

*‘मेडिसिन्स सान्स फ्रॉन्टियर्स’च्या उपक्रमातून पहिलीच पोस्टिंग आफ्रिकेत मिळालेला एक डॉक्टर...तिथं पोहोचताच पाहतो मातीच्या झोपड्या, खाणींचं भोवताल आणि तो एकमेव डॉक्टर असलेलं भयंकर स्थितीतील इस्पितळ... आफ्रिकेतल्या वैद्यकीय सेवेची दुरवस्था मांडत असतानाच, निखळ अनुभवांची खुमासदार चित्रणं करत डॉ. डॅमियन ब्राऊननी उलगडलेला एक विलक्षण पट..*

आफ्रिकेतल्या ‘अंगोला’ या देशातला वसाहतवाद नोव्हेंबर १९७५मध्ये संपुष्टात आला. हा देश नव्यानं स्वायत्त झाला. वसाहतवादाविरोधात आधी एकत्रपणे लढणाऱ्या शस्त्रसज्ज स्वातंत्र्यवादी गटांमध्येच, या स्वायत्त देशात सरकार कुणी स्थापन करायचं, यावरून संघर्ष सुरू झाला. या संघर्षानं यादवी युद्धाचं उग्र रूप धारण केलं. हे युद्ध तब्बल सत्तावीस वर्षं चालू होतं. आणि त्या सगळ्या धुमश्चक्रीत अनेक वर्षं अतोनात हाल सहन करत होती, ती तिथली सर्वसामान्य जनता. जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्वच पायाभूत सुविधांचा, आरोग्यसेवेचा अभाव, कुपोषण आणि उपासमार हेच या लोकांचं जगणं झालं होतं. यात भर पडत राहिली, ती वेगवेगळ्या जमातींमधल्या संघर्षांची. गुरं-ढोरं, शेळ्या-मेंढ्या ही सामान्यांकडे असणारी एकमेव संपत्ती, माणसांच्या जिवापेक्षाही मौल्यवान झाली होती, आणि त्यावरूनच हे संघर्ष होत होते. देशातली यादवी संपली तरी असे संघर्ष सातत्यानं चालूच होते.


अशा चहूबाजूंनी होरपळणाऱ्या अंगोलातल्या शहरांवर या युद्धाचा सर्वांत भीषण परिणाम झाला होता. त्यातलं एक शहर होतं, ‘माविंगा.’ ज्या शहराची आणि तिथे राहणाऱ्या लोकांचीही अतिशय दारुण अवस्था झाली होती. आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या अनेक मानवहितवादी संघटना आणि त्यांच्यासाठी काम करण्यास उत्सुक असणारे अनेक सेवाभावी स्वयंसेवक, अंगोलन लोकांना अन्न-पाणी आणि आरोग्य, यांसारख्या सेवा पुरवण्यासाठी सज्ज झाले होते.

‘मेडिसिन्स सान्स फ्रॉंटियर्स’ या अशाच एका संस्थेने माविंगामध्ये उभारलेल्या तात्पुरत्या हॉस्पिटलमध्ये, डॅमियन ब्राऊन हे तरुण ऑस्ट्रेलियन डॉक्टर, स्वयंसेवी डॉक्टर म्हणून रुजू झाले होते. तिथे प्रत्यक्ष काम सुरू केल्यानंतर आलेले वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव या पुस्तकात त्यांनी जसेच्या तसे, पण साध्या, प्रवाही आणि संवादी भाषेत, दृश्यमय स्वरूपात लिहिले आहेत... ससेहोलपट सहन करत जगणारी, बरीचशी अडाणी असणारी आणि दारिद्र्याच्या समुद्रात गटांगळ्या खाताना प्राण वाचवण्यासाठी धडपडणारी सर्वसामान्य जनता, कुपोषित असणारी असंख्य मुलं, आरोग्याच्या बाबतीतलं सर्वांचंच अज्ञान, सतत फैलावणाऱ्या आजारांच्या

साथी, संवाद साधताना येणारा भाषेचा अडसर हे सगळे अनुभव तर आहेत; शिवाय त्याच्या जोडीनं, बाहेरून येणाऱ्या डॉक्टरांशी स्थानिक आरोग्यसेवकांचे आडमुठं वागणं, वैद्यकीय सुविधांची कमतरता, त्यामुळे येणारी हतबलता, यांबाबतचेही लेखकाचे अनेक अनुभव यात आहेत. हॉस्पिटलमध्ये सातत्यानं होणारे मृत्यू आणि तितक्याच सातत्यानं वाढणारी पेशंट्सची संख्या, टोळीयुद्धात होणाऱ्या गोळीबारामुळे स्वतःच्याही जिवाबद्दल वाटणारी अदृश्य भीती... आणि मग या सगळ्या पार्श्वभूमीवर लेखकाला स्वतःला जाणवणाऱ्या स्वतःतल्या उणिवा, अधूनमधून भेडसावणारी निराशा, वैताग, असं काम करत राहावं की नाही, अशा दोलायमान अवस्थेत ठेचकाळणारं मन... या सगळ्याचं अगदी प्रामाणिक चित्र लेखकानं उभं केलं आहे.

त्याचबरोबर असं मदतकार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, त्यांच्या कामाचा झपाटा आणि मर्यादा, त्यांच्या मदतीमुळे घडणाऱ्या दृश्य परिणामांची व्याप्ती आणि सीमा यांचंही अगदी यथार्थ समीक्षण, मोजक्या शब्दांत या पुस्तकात केलं आहे. स्वतःच्या मर्यादांचं भान ठेवून ''आम्ही 'ब्रोकन लेग'ला निदान 'बॅन्ड-एड' तरी लावू शकलो,'' असा फक्त आणि फक्त सकारात्मक विचार करतच काम करत राहणाऱ्या अशा संस्थांसाठी, आणखी काम करत राहण्याचा निर्धार करत, त्या कामाचा आदर करत, स्वतःचं नकारात्मकतेकडे झुकणारं मन, स्वतःच सकारात्मकतेकडे वळवणाऱ्या या डॉक्टरचं हे पुस्तक, पूर्ण वाचल्याशिवाय खाली ठेवूच नये, असं वाटण्याइतकं सहज, सुंदर आणि निरलसपणे शब्दांकित केलं गेलं आहे. या लेखकाचं हे पहिलंच पुस्तक आहे, यावर खरं तर विश्वासच बसत नाही.

**नवी संहिता... नवा आशय...**




# कॉर्पोरेट कबीर

## गुरुचरण सिंग गांधी

अनुवाद - **सायली गोडसे**

कबीराने दोह्यांतून मांडलेलं तत्त्वज्ञान आणि आजच्या कॉर्पोरेट युगातील व्यवस्थापन याची घातलेली उपयुक्त, मार्गदर्शक सांगड

**किंमत : ३००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**नवी संहिता... नवा आशय...**




# ऐसी अक्षरे

## मैत्रेयी जोशी

नियती...


मानवी मन...

नातेसंबंध...

सामाजिक परिस्थिती यांच्या संमिश्र धाग्यांतून विणल्या गेलेल्या स्त्रीकेंद्रित कथा

**किंमत : २१०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय




# डेस्टिनेशन

**प्रा. पुरुषोत्तम रामदासी**


*बोकाळलेला दहशतवाद आणि त्याला पुरून उरणारे निर्भय पोलीस अधिकारी...असीम शौर्याच्या धडाकेबाज कथा... दहशतवाद्यांचं, गुन्हेगारांचं अंगावर शहारे आणणारं क्रौर्य आणि पोलीस, गुप्तहेरांचं असीम शौर्य या संघर्षनाट्यातून रंगलेल्या थरारक कथांचा संग्रह*

सचिवालयात काम करणारी दीपा सापडली आहे हाजी बिलाल नावाच्या एका क्रूर दहशतवाद्याच्या जाळ्यात...दीपाचा खोटा पासपोर्ट तयार करून तिच्यामार्फत इराकला कोकेन पाठवण्याची योजना आहे बिलालची...ते कोकेन माणसाला उत्तेजित करणारं आहे...महावीर नावाचा गुप्तहेर पोलिसांना मदत करतो दीपापर्यंत पोचण्यात...काय असते त्याची योजना?...वाचा 'षड्‌यंत्र' या कथेत...

एका हवेलीत एक गुप्त खजिना आहे...त्याच्या किल्ल्या आहेत एका संग्रहालयात... तबरेज आणि खतिब या हवेलीचा मालक अल अमिन याच्या सांगण्यावरून त्या किल्ल्या चोरतात आणि अमिनच्या सुपूर्द करतात...दरम्यान, डीके नावाचा एक नामवंत उद्योजक मॉलमधील दोन मौल्यवान घड्याळं चोरतो आणि चोरी उघडकीला आल्यावर आत्महत्या करतो...अल अमिन आणि एका न्यूरो सर्जनचा डीकेंबाबत घडलेल्या घटनेशी संबंध आहे...काय आहे तो संबंध? किल्ल्यांची चोरी आणि डीकेंची आत्महत्या यातील धागेदोरे शोधत इन्स्पेक्टर धनंजय अल अमिनपर्यंत कसा पोचतो?... वाचा 'मृगजळ' ही कथा...

दहशतवाद, गुन्हेगारांचं अंगावर शहारे आणणारं क्रौर्य आणि पोलीस, गुप्तहेरांचं असीम शौर्य अशा संघर्ष नाट्यातून रंगलेल्या थरारक कथांचा संग्रह.

## पुस्तक परिचय




# प्लँटोन

**डॉ. संजय ढोले**

*अन्यायाची विघातकता आणि विज्ञानाची विधायकता, यांचं रंजक चित्रण करणारी डॉ. संजय ढोले यांची पहिली विज्ञान कादंबरी*

आपल्या भोवतालच्या समाजाशी, मातीशी आपलं नातं जडलेलं असतं. समाजातील प्रत्येकाला ही जाण असली की, माणसाला आपल्या कर्तव्याचंही भान राहतं; आणि मग ते कर्तव्य सुनिश्चितपणे पार पाडण्याकरीता ज्ञान-विज्ञान, आधुनिक प्रणाली, संगणक, नवनवीन तंत्रज्ञान यांची जोड घेण्याची आवश्यकता भासते. 'प्लँटोन' या वैज्ञानिक कादंबरीतून लेखक डॉ.संजय ढोले यांनी कर्तव्यदक्ष, सच्च्या वनअधिकाऱ्याची जीवनकथा अतिशय उत्तमरीत्या साकारलीय. वनअधिकारी सुनील सोनवणे यांची बदली म्हणजे शत्रूंच्या दुष्ट कारवायांचा, अन्यायाचा समाचार आणि गोरगरीब आदिवासी व आपल्या देशबांधवांविषयीचे अतूट प्रेम, हे सर्वांनाच परिचयाचे झालेले. म्हणूनच त्यांची बदली रामपूरसारख्या दुर्गम भागात केली जाते, जिथे कमालीचा भ्रष्टाचार, निष्ठुरपणा, अन्याय, स्वार्थी दलदल, दुष्ट-विकृतांचे साम्राज्य, वनसंपत्तीची तस्करी व जुलमी राजकारण्यांचे दिवसेन्‌दिवस वाढते प्रस्थ! स्वत:चा जीव धोक्यात घालून सोनवणेंना येथे नंदनवन फुलवायचे असते. होते का या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याचे येथे स्वप्न साकार? कोण आणि कसे लोक भेटतात त्यांना? काय असते इथली रणनीती?

या कथानकातील प्रत्येक प्रकरणातून पुढे काय होणार ही उत्सुकता वाचकांना निश्चितच वास्तवाकडे घेऊन जाते. मन विचार करू लागते... जीवनातील भले-बुरे अनुभव, नाट्य, संघर्ष, संकटांवर मात करून जगण्यास शिकवतात. ही कादंबरी केवळ विज्ञानाचे,आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे न देता माणसातील माणूसपणाचा शोध घेते. विज्ञान सकळ जनांना शहाणे करून सोडते तसेच निसर्गावरही भरभरून प्रेम करायला शिकवते. विज्ञानविषयक नवीन तंत्रज्ञान, वनस्पती शास्त्रातील संशोधन,जगभरातील विज्ञानविषयक चर्चा, घडामोडी, संशोधन प्रकल्प, अमेरिकेतील अभ्यासपद्धती या सर्वांचा धांडोळा या वैज्ञानिक कादंबरीतून घेतलेला असला तरीही; मानवी नात्यांचे बंध, सच्ची मैत्री, प्रेमाचे अतूट धागे, साक्षरतेचा मूलमंत्र देणारी; खऱ्या अर्थाने जीवन समृद्ध करणारी ही कादंबरी आहे.

कादंबरीतले दैनंदिन जीवन, साधेसाधे प्रसंग, दारिद्र्य आणि कुरघोडी-गुंडगिरी पाहून मन उद्विग्न होते. शर्थीचे प्रयत्न करून सोनवणे या सर्व अवैध गोष्टींचा बीमोड करतात. त्यांना साथ देणारा, सहायक म्हणून रुजू झालेला

निशिकांत,स्वयंपाकी असलेले आणि वडिलांसमान असलेले जाधवकाका, ड्रायव्हर- नटवरसिंग, भोळेभाबडे आदिवासी यांची सोबत आणि मित्र डॉ.समीर ताटकरे, डॉ. अंजली, डॉ. इला, डॉ. पाबळकर या सर्वांचा एक छान गोतावळा-परिवारच सोनवणे पती-पत्नीच्या मागे खंबीरपणे उभा असतो...... तरीही घडू नये असे घडते आणि दुष्ट शक्ती आपले विषारी-विखारी बाहू पसरते.... दु:ख-यातना, अन्याय, खोटेपणा, अविश्वास, खुनासारखे लांच्छनास्पद आरोप सोनवणेंसारख्या प्रामाणिक अधिकाऱ्यावर लावले जातात. रामपूर क्षेत्रातली बडी धेंडं, धूर्त राजकारणी मंडळी बापूसाहेब, दत्तात्रय, भाऊसाहेब, माधवराव शिंदे इत्यादी धूर्त-कावेबाज मंडळी सोनवणेंविरुद्ध खोटे पुरावे सादर करून त्यांना कायद्याच्या डावपेचात अडकवतात. त्यांच्यावर वाट्टेल ते आरोप लावतात. जंगल तस्करी, मारामाऱ्या, खून, गुंडगिरी यांचे सत्र अव्याहत चालू राहते. निरक्षर, गरीब आदिवासींना पोटाकरीता गुन्हे करण्यास भाग पाडले जाते. सोनावणेंना कोर्टाकडून फाशीची शिक्षा सुनावली जाते. सर्व पुरावे नष्ट केले जातात. काय असते नियतीच्या मनात? कोण न्याय देते या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याला? याकरता जरूर वाचावी, वैज्ञानिक लेखक डॉ. संजय ढोले यांची 'प्लँटोन' ही कादंबरी!

'प्लँटोन' हे एक इलेक्ट्रॉनिक उपकरण. भारतीय क्षेत्रात अव्वल दर्जाचे कार्य करणारे, जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ, विज्ञान संस्थेचे डॉ.पाबळकर, डॉ. समीर ताटकरे व त्यांची सहायक डॉ. अंजली हे वनस्पतिशास्त्राचे प्रयोग अथक परिश्रम घेऊन करत असतात. त्यांच्या अभ्यासाला गती येते. 'प्लँटोन' हे उपकरण साधं पण अतिशय संवेदनक्षम असते. वनस्पतींच्या अंतरंगात शिरून मौलिक माहिती या यंत्राद्वारे शास्त्रज्ञ मिळवत असतात. मेंदूसदृश प्रथिनांचा शोध घेण्याकरीता 'प्लँटोन' मदत करते. विविध सूक्ष्म इलेक्ट्रोड वापरून त्यांतून विद्युतीय संकेत पिंजकांमधून मिळवून वनस्पतिशास्त्र मोलाचे कार्य करते. डॉ. समीर ताटकरेंसारखा वैज्ञानिक हा सुनील सोनवणेंचा कॉलेजमधला जिवलग मित्र! डॉ.समीर सखोल अभ्यास करून 'प्लँटोन'चा वापर करून, सर्व पुरावे नष्ट केलेले असतानाही आपले बौद्धिक कष्ट पणाला लावून आपला जिवलग मित्र-सच्चा वनपाल अधिकारी सुनील सोनवणे

याला फाशीच्या शिक्षेपासून वाचवतो. अखेर सत्य, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठता यांचा विजय होतो. कसा होतो?

'प्लँटोन'द्वारे वनस्पतीं गुन्हेगारांचे कोणकोणते पुरावे समोर आणतात? आणि कशा प्रकारे? याकरता खास वाचलीच पाहिजे डॉ. संजय ढोले लिखित 'प्लँटोन' ही कादंबरी. कोर्टात न्यायाधीश महोदयांपुढे आणि सर्व विश्वालाच गवसणी घालण्याचे महान कार्य वनस्पतिशास्त्रातल्या अभ्यासाने घडून येते. कोर्टातील 'प्लँटोन'चा चमत्कार पाहून थक्क होतात लोक! खऱ्या गुन्हेगारांना रंगेहाथ पकडते 'प्लँटोन'! कसा होतो पर्दाफाश? डॉ. समीर ताटकरेंच्या, डॉ. अंजलीच्या सखोल अभ्यासाला व सर्व वैज्ञानिकांच्या भगिरथ प्रयत्नांना अखेर यश मिळते.... जिथे सत्याचा अंकुर फुटतो... तिथे निराशा, उदासीनता, अमंगळ वाऱ्यालाही उभे राहत नाही...! नियतीलाही न्याय हा द्यावाच लागतो...! अशी ही सुंदर, शेवटपर्यंत रहस्य जपणारा डॉ. संजय ढोले यांची 'प्लँटोन' सारखी सुंदर वैज्ञानिक कादंबरी रसिक वाचकांनी जरूर वाचली पाहिजे.

◆


**नवी संहिता... नवा आशय...**





# स्थलांतर

**उमेश कदम**

भूमध्य समुद्रातून अत्यंत धोकादायक प्रवास करून बेकायदेशीरपणे युरोपला स्थलांतर करू इच्छिणाऱ्यांच्या आयुष्यात पदोपदी घडत असणाऱ्या हृदयद्रावक, सत्य घटनांवर आधारित नाट्यमय, माहितीपूर्ण आणि उत्कंठावर्धक कादंबरी.

**किंमत : २१०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय




# भिंतींना जिभाही असतात

■

**डॉ. बाळ फोंडके**

■

*जिथे पोचू शकत नाहीत पोलीस, तिथे पोचतात वैज्ञानिक... पोलीस तपास आणि विज्ञान-संकल्पनांच्या अनोख्या मिश्रणातून साकारलेल्या कथा*

आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित लक्षवेधक गुन्हेगारी कथांचा संग्रह म्हणजे डॉ. बाळ फोंडके यांचा ‘भिंतींना जिभाही असतात’ हा होय. या कथासंग्रहामध्ये त्यांनी हाताळलेल्या गुन्हेगारी प्रकरणांची सविस्तर मांडणी आणि बुद्धिकौशल्य, विज्ञान व तंत्रज्ञानातील सूत्रांच्या आधारे त्यांची कल्पकतेने उकल अशी विलक्षण रचना आहे. डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस अमृतराव मोहिते आणि विज्ञान व तंत्रज्ञान सल्लागार डॉ. कौशिक दोघे परम मित्र आहेत. पारंपरिक आणि नेहमीच्या पोलिसी पद्धतीने न सुटणाऱ्या वेगळ्या प्रकारच्या गुन्ह्यांच्या तपासामध्ये डॉ. कौशिक, विज्ञान व तंत्रज्ञानातील सूत्रांचा वापर करून गुन्ह्याची सोडवणूक करण्यास अमृतरावांना मदत करतात. ‘वाचेवीण संवादु?’ या कथेमध्ये बलात्काराच्या धक्क्याने एक महिला ‘कोमा’सदृश स्थितीत जाते. ती कोणतीही शारीरिक हालचाल करू शकत नसली तरी तिचे डोळे उघडे असतात. तसेच तिच्या मेंदूतील विचारप्रक्रियेची यंत्रणा व डोळ्यांतील जाणीव पूर्णपणे शाबूत असते; त्यामुळे ‘फंक्शनल मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग’ तंत्राद्वारे डॉ. कौशिक त्या महिला पेशंटशी शब्दाविना संवाद साधून तिच्यावर अत्याचार करणाऱ्याचा चेहरा अमृतरावांना दाखवून देतात.

राजकारणात यशस्वी अशा मोठ्या भावाची सफलता सहन न झाल्याने नेहमी वादविवाद आणि भांडण करणारा धाकटा भाऊ एके दिवशी पिस्तुलाची गोळी घालून त्याचा खून करतो. तसेच मोठ्याने स्वतःच डोक्यात गोळी झाडून घेऊन आत्महत्या केली असा देखावा तयार करून तेथून गायब होतो. मात्र, ‘कार्पल टनेल सिन्ड्रोम’ हा विकार असणारा मोठा भाऊ अशा तऱ्हेने आत्महत्या करूच शकणार नाही हे डॉ. कौशिक सिद्ध करतात, असे वर्णन ‘हातचलाखी’ कथेत आहे.

तर ‘कौन’ या कथेमध्ये एका डॉक्टरांच्या मत्स्यालयात असणारा जिवंत शंख चोरून तो दुर्मिळ वस्तुसंग्रह करणाऱ्या परदेशी पर्यटकास मोठ्या किमतीला विकू पाहाणाऱ्या लोभी व्यापाऱ्याला प्रत्यक्ष त्या शंखाच्या जहाल विषाचा प्रसाद मिळून आपला जीव गमवावा लागतो.

‘ए फॅब्रिकेटेड स्टोरी’मध्ये चीफ ऑफ आर्मी स्टाफने पंतप्रधानांना पाठवलेल्या आणि लीक झालेल्या गोपनीय पत्राच्या शोधाची कथा आहे. हा सारा त्या पत्राचे डिक्टेशन घेणाऱ्या महिला सेक्रेटरीने नेसलेल्या ऑप्टिकल

फायबरयुक्त धाग्याने विणलेल्या साडीचा प्रताप आहे, असे डॉ. कौशिक अमृतरावांच्या मदतीने पंतप्रधानांच्या निदर्शनास आणतात. 'हुकुमाचा गुलाम' कथेमध्ये धनाचा लोभी असलेला जावई हेतुतः अपघात घडवून, विकलांग अवस्थेतील सासऱ्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करतो. त्यांच्या डोक्याभोवती फेट्यासारखी बसणारी टेलिमेट्री डिव्हायसेस यंत्रणा व सेवेसाठी एक यंत्रमानव देतो. त्या दोहोंच्या इलेक्ट्रिक जोडणीमुळे सासरे आपल्या मेंदूतले विचार रोबोपर्यंत पोहोचवू शकत होते. साहजिकपणे आपल्या जिवावर उठलेल्या जावयाला संपवण्याची आज्ञा त्यांनी त्या यंत्रमानवाला दिली.

संपत्तीच्या मोहाने उद्योगपती शंतनुरावांचा पुतण्या समीरच सुऱ्याने भोसकून त्यांचा खून करतो. शंतनुराव रोज रात्री झोपताना ठीक आठ तास जळणारी सुंगधी मेणबत्ती लावत असत; पण मेणबत्तीच्या अवतीभोवती मीठ टाकून, तिची जळण्याची वेळ वाढवून समीरने हे दुष्कृत्य केले असे शंतनुरावांचे मित्र अमृतराव आणि डॉ. कौशिक सिद्ध करतात. हे वर्णन 'मेणबत्तीचे म्हणणे काय आहे?'मध्ये आहे.

तर 'आ बैल मुझे मार!' या कथेमध्ये डॉ. कौशिक यांनी एका कथेद्वारे आपली बदनामी केली हा एका सिनेअभिनेत्याचा आरोप डॉ. कौशिक कसा परतवून लावतात त्याचे वर्णन आहे.

स्त्रीगर्भ आहे असे समजल्यावर पत्नीचे 'मिसकॅरेज' घडवून, दुसऱ्या खेपेस तसेच निदान झाल्यावर फिरायला जाण्याच्या निमित्ताने तिच्यावर गुंडांकरवी जीवघेणा हल्ला करवणाऱ्या निर्दयी नवऱ्याचे दर्शन 'धनाची पेटी' या कथेत घडते.

न्यूरोसर्जन डॉक्टरांनी मुलाच्या मेंदूचे ऑपरेशन करताना त्याच्यावर कंट्रोल ठेवण्यासाठी डोक्यात संगणक चीप बसवून, त्याला यंत्रमानव बनवले अशी तक्रार घेऊन आलेल्या दाम्पत्याला डॉ. कौशिक विविध उदाहरणांद्वारे तो यंत्रमानव नसून इतर सर्वसाधारण माणसांसारखाच आहे, हे पटवून देतात. हे वर्णन 'माणसांची भाषा' कथेमध्ये आहे.

या कथासंग्रहातील सर्व कथा आधुनिक विज्ञानाशी निगडित असून, वाचताना पुढे काय होणार, अशा उत्सुकतेपोटी वाचकाला खिळवून ठेवतात.

**नवी संहिता... नवा आशय...**





## अजून नाही जागी राधा

**स्नेहलता जोशी**

अष्टवक्रा कुब्जा, राधा आणि श्रीकृष्णाच्या स्नेहबंधाचा अध्याय... स्वच्छंदी, नितळ मनाच्या पत्नीने पतीला दिलेली ‘वचनपूर्ती’रूपी भेट... एकतर्फी प्रेमातून फुललेला मत्सराचा अंगार... आशयपूर्ण कथांचा विविधरंगी आविष्कार

**किंमत : २१०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**नवी संहिता... नवा आशय...**




प्रथम चढाईची ‘महागाथा’

## एव्हरेस्ट

१९५३


**मिक कॉनफ्रे**

अनुवाद - **विनीता जोगळेकर**

१९५३ सालची एव्हरेस्ट चढाई म्हणजे गिर्यारोहणाच्या इतिहासातील सुवर्णक्षण. या थक्क करणाऱ्या ऐतिहासिक प्रवासाचा पुनर्अनुभव देणारा अनमोल दस्तावेज

**किंमत : ४२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय




# द ग्रेट तमाशा

**जेम्स ॲस्टिल**

अनुवाद

**सुदर्शन आठवले**

*भारतीय क्रिकेट निव्वळ खेळ नसून नेत्यांपासून अभिनेत्यांचे लागेबांधे असणारा एक राष्ट्रीय करमणूक कार्यक्रम आहे. या खेळाचा खेळखंडोबा होण्यामागच्या कारणांचा सडेतोड लेखाजोखा...*

२००८ सालच्या एप्रिल महिन्यातील त्या संध्याकाळी बेंगलोर येथे क्रिकेट आणि भारत दोन्ही कायमचे बदलून गेले! ती इंडियन प्रीमिअर लीग या क्रिकेट स्पर्धेची पहिली संध्याकाळ होती; पण ते क्रिकेट निराळे होते; नेहमीचे, ओळखीचे नव्हते. ते प्रचंड श्रीमंत होते, कमालीचे चमकदार होते, अतिशय मनमोहक होते, त्यात मादक नर्तकी होत्या, बॉलीवूडमधील प्रसिद्ध तारे-तारका होत्या. तो मैदानी खेळ कमी, तर करमणूकप्रधान, भडक, ढंगदार 'तमाशा'च जास्त होता.

जो खेळ आणि जो देश शांती, अमर्याद सहनशक्ती, सोशीकपणा या गुणांशी जोडला गेलेला आहे तोच खेळ, त्या देशात अशा क्रांतिकारी रूपात कसा जन्माला आला, बहरला याचा वेध 'द ग्रेट तमाशा' हे पुस्तक घेते. भारताने घेतलेली आर्थिक क्षेत्रातील भरारी आणि भारतवासीयांच्या मनातील क्रिकेट या खेळाविषयीचे विलक्षण वेड या दोन गोष्टींमुळे भारताने, क्रिकेटच्या मैदानावर फारसे नाही पण मैदानाबाहेर, आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या जगात कसे वर्चस्व संपादन केले, एक महत्त्वपूर्ण स्थान कसे प्राप्त करून घेतले, एक प्रभावी शक्ती म्हणून कसा मान मिळविला हे जेम्स अॅस्टिल या पुस्तकात विशद करतात. भारतातील कोट्यवधी प्रेक्षकांच्या डोळ्यांदेखत देशातील क्रिकेट हे भारतातील प्रसिद्ध, मान्यवर, वलयांकित व्यक्ती, त्यांची शक्ती, संपत्ती आणि त्याबरोबरच भ्रष्टाचार अशा सगळ्या गोष्टी एकत्र नांदणारा आखाडा कसे बनले याविषयी ते सांगतात.

त्याचा शोध घेण्यासाठी जेम्स अॅस्टिल भारत या खंडप्राय देशात सर्वत्र हिंडतात आणि चहाच्या कपांसोबत आधुनिक भारत घडविण्यात वाटा उचलणाऱ्या अनेकविध व्यक्तींना—विलीन झालेल्या संस्थानांच्या राजांपासून गल्लीबोळातील पुस्तकविक्रेते आणि कोट्यधीशांपासून झोपडपट्टीतील रहिवासी यांना भेटतात. क्रिकेटने त्यांच्या आयुष्याला आणि देशाच्या जीवनाला कसा आकार दिला हे त्यांच्याकडून जाणून घेतात. अखेरीस ते लंडनमध्ये क्रिकेटच्या इतिहासातील 'शापित गंधर्वा'ला—ललित मोदी या अनोख्या व्यक्तीला—भेटतात. ज्यांनी कल्पकतेने, धडाडीच्या अथक प्रयत्नांच्या साहाय्याने क्रिकेटच्या जगतात अद्भुत अशी क्रांती घडवून आणली; पण अखेरीस ज्यांना अत्यंत लाजिरवाण्या पद्धतीने अप्रतिष्ठेला सामोरे जावे लागले त्या ललित मोदींना

भेटतात आणि या सर्व भेटी, मुलाखतींमधून उलगडणारी, आधुनिक भारताच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणारी ही ‘क्रिकेटकथा’ कथन करतात.

‘द ग्रेट तमाशा’ हे जसे भारतीय क्रिकेटमध्ये घडून आलेल्या अत्यंत महत्त्वपूर्ण बदलाचे अतिशय चित्तवेधक असे वर्णन आहे, तसेच ते कोणालाही सातत्याने मोहात पाडणाऱ्या, पण मुखवट्याआड वेगळा चेहराही असणाऱ्या भारत नावाच्या देशाचे एका बुद्धिमान विचारवंताने केलेले चित्रणही आहे. आधुनिक भारतातील कार्यपद्धती ज्यांना समजावून घ्यायची असेल अशांसाठी या पुस्तकाचे वाचन अनिवार्य आहे.

नवी संहिता... नवा आशय...





धर्मवेध

ल. सि. जाधव

धर्म...एक कल्याणकारी संकल्पना...ही संकल्पना उलगडून दाखवणारी...सर्व धर्मांभोवती फिरणारी चिंतनीय कादंबरी

किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

**नवी संहिता... नवा आशय...**




# 1912
## अंटार्क्टिकाच्या शोधात


**ख्रिस टर्नी**

अनुवाद - **मोहन गोखले**

दक्षिण ध्रुवीय प्रदेशातील साहसी मोहिमांतील थरार...साहसवीरांचा पक्का निर्धार...खडतर प्रवासाच्या कथा जोरदार

**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**नवी संहिता... नवा आशय...**




# दोस्ती दुनियादारी और दिल

**मंजुश्री गोखले**

हिंदू-मुस्लीम धर्म भिन्न; परंतु ‘हृदयाची’ परिभाषा जाणते मानवतेचे मर्म...सर्वधर्मसमभावाचा भावपूर्ण संदेश देणारी कादंबरी

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# कास्ट मॅटर्स

▪

**सूरज एंगडे**

अनुवाद

**प्रियांका तुपे, प्रणाली एंगडे**

▪

*जातीबाबत खोलवर रुजलेल्या भावना आणि विषमतामूलक व्यवस्थेचं परखड परीक्षण... पहिल्या पिढीचे दलित अभ्यासक सूरज एंगडे यांचं धाडसी आत्मकथन*

## जातीनं घडवलेल्या आत्मतत्त्वाची एकविसाव्या शतकातील रूपं

माझी आई (आजी - वडिलांची आई) मला तिच्या मऊशार कुशीत घेऊन, म्हणत असे, 'म्हवं लेकरू, किती नादर हाये. अशे इतके सुंदर डोळे कुणाचे तरी हायेत का? मज्या बाळा, तुज्यात इतके गुणं हायेत की मज्यासारख्या येडीला कुठं मोजता यायलंय?' रात्रीच्या वेळी माझ्याशी बोलताना, घरातल्या झिरो बल्बच्या जवळपास नसलेल्या उजेडातही तिचा काळवंडलेला चेहरा आणि रापलेली त्वचा चमकायची. मी आजीचा जीव की प्राण होतो, याची ती सतत जाणीव करून द्यायची.

अंधूक अंधूक प्रकाश असणारा स्वस्तात मिळणारा झिरो बल्बच आमच्या घरातला उजेडाचा एकमेव स्त्रोत. तो बंद होता. आजी मला धीर देत होती, समजावत होती. आमचं घर टोयोटाच्या मिनीबसएवढं. त्या एवढ्याशा घरात आजी, माझे आई-वडील, बहीण-भाऊ असे आम्ही सगळे राहत होतो. घरातल्या खाटेखालच्या जागेत माझे आजारी वडील, मी आणि भाऊ झोपायचो. आई आणि बहीण खाटेला लागूनच काटकोनात एका नायलॉनच्या चटईवर झोपत.

आजी माझ्या गालावरून हात फिरवत होती. आता ती डोक्याला मालीश करू लागली. तिच्या त्या मऊ हातांनी सारं काही सोसलं होतं. अस्पृश्यता, न्यूनगंड लादणाऱ्या परंपरा, तिच्या कुटुंबाचं पोट भरण्यासाठी शेतात, खाणीत भूमिहीन मजूर म्हणून राबण्याचा तिचा निग्रह किंवा एखाद्याच्या घरी नाही तर मिलमध्ये नोकर म्हणून राबणं. तिच्यासारख्याच चेहरा नसलेल्या, कसलीही ओळख निर्माण करू न शकलेल्या; पण तरीही खूप महत्त्वाच्या लोकांचं ती प्रतिनिधित्व करते. हिंदू धार्मिक संरचनेने काही लोकांना गावगाड्याबाहेर ढकललं. या लोकांची निर्भर्त्सना केली जाते, द्वेष केला जातो. कसलीही मानवी प्रतिष्ठा, मोल नसलेलं जगणं यांच्या वाट्याला येतं. सार्वजनिक अवकाशात दलितांनी इतरांकडे साधा कटाक्ष टाकला तरी संपूर्ण समाजावर त्याचा राग काढला जातो, त्यांच्यावर हिंसेची बरसातच केली जाते. त्यांच्या जिवाला कसलीही किंमत नाही, माझी आजी अशा लोकांचं प्रतिनिधित्व करते.

कोट्यवधी लोक हे असं आयुष्य जगतात. भारतात जातीप्रश्नाचा संबंध १३५ कोटी लोकांशी आहे. १०० कोटी लोकांच्या आयुष्यावर जातिव्यवस्थेचा परिणाम होतो. त्यांपैकी ८० कोटी लोकांवर जातीचा वाईट

परिणाम होतो. ५० कोटी लोकांची मानवी प्रतिष्ठा हिरावून घेतली जाते आणि त्यांच्यावर गुलामीचं जगणं लादलं जातं. ३० कोटी अस्पृश्यांचं भयंकर शोषण केलं जातं. माणसाला कराविशी वाटणार नाहीत, अशी कामं त्यांच्याकडून करून घेतली जातात. दलित वस्त्या उद्‌ध्वस्त करणं, त्यांच्यावर गुलामी- दास्यत्व लादणं, सक्तमजुरी, बलात्कार, हत्याकांड, जाळपोळ, लुटालूट, तुरुंगवास, पोलिसी अत्याचार, जातीय शिविगाळ- शेरेबाजी, अपमान, अवहेलना, त्यांचं नैतिक खच्चीकरण हे ३० कोटी भारतीय अस्पृश्यांचं जगणं आहे.[१]

लहानपणी शाळेची फी वेळेवर भरता न आल्याने मला अवहेलना सहन करावी लागायची. शाळेचा कारकून टोनी - दर तीन महिन्यांनी वर्गामध्ये फेरी मारायचा आणि माझं नाव पुकारून मला उभं राहायला सांगायचा. मी उभा राहिलो की तो माझी किती महिन्यांची फी भरायची बाकी आहे, हेही वाचून दाखवायचा. फीचा आकडा जेवढा जास्त तेवढं जास्त अपमानित वाटायचं. त्यात माझे वर्गमित्र थंडपणे माझ्याकडे पाहत एक तुच्छ कटाक्ष टाकायचे. त्या शरमेने मेल्याहून मेल्यासारखं वाटायचं. हे नेहमीचंच होतं. जेव्हा जेव्हा टोनी वर्गात यायचा तेव्हा मला शाळा सोडून पळून जावंसं वाटायचं. आमच्या वस्तीतल्या रोजंदारीवर खपणाऱ्या मजूर लोकांसोबत काम करावं, असं वाटायचं. समोर दिसेल त्या मार्गाने पोट भरणारे आणि जगण्याची भ्रांत नसलेले हे लोक त्यांच्या मर्जीने जगत. जगण्यासाठी त्यांना कुणाकडून अपमानित तरी व्हावं लागत नव्हतं.

सहाव्या इयत्तेत जाईपर्यंत मी त्यामानाने अतिशय गरिबीत जगलो. त्याच दरम्यान सरकारदरबारी दारिद्र्यरेषेखालील गरिबांमध्ये आमचा समावेश झाला. दारिद्र्यरेषा हे वंचिततेचं मोजमाप करण्याचं राज्यानं ठरवलेलं एक परिमाण आहे. दहाव्या पंचवार्षिक योजनेनुसार त्याचे सात निकष ठरवलेले आहेत. केरळमध्ये अशा प्रकारचे नऊ तर हरयाणामध्ये पाच निकष आहेत. कुटुंबांच्या मालकीची शेतजमीन, रोजगार, शैक्षणिक स्तर, मुलांची परिस्थिती, स्वच्छता, घरावरचं छप्पर, जमीन, पिण्यायोग्य पाणी, वाहतूक व्यवस्था, अन्न, घरात रंगीत टीव्ही, फ्रिज असणं...अशा प्रकारचे हे निकष आहेत. यामध्ये कुटुंबाचं उत्पन्न हा एक निकष असा होता, की जो एखाद्याकडे वरील सर्व घटक उपलब्ध आहेत की नाही, त्यावरून ठरत असे आणि राज्याराज्यात त्याबाबत भिन्नता होती. महाराष्ट्रात दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या १३ निकषांवर आधारित आहे. असे ४६ लाख लोक

दारिद्र्यरेषेखाली आहेत. (ही संख्या १९९० मधल्या दारिद्र्यरेषेखालील एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के आणि २००० मध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येच्या प्रमाणात ३९ टक्के इतकी आहे.)[२] २०१२ मध्ये जागतिक बँकेच्या अहवालात एकूण लोकसंख्येच्या १७ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली होते. या अहवालात महाराष्ट्राच्या उत्तर-पूर्व भागातील जिल्ह्यांमध्ये गरिबीचं प्रमाण वाढलेलं आहे, यावर भर देण्यात आला होता. नांदेड जिल्ह्यात १८ ते २४ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जगत होती.[३] त्यातही अनुसूचित जातींतील कुटुंबं आणि इतर जातींतील कुटुंबं अशी वर्गवारी केलेली नव्हती. शहराच्या परिघावर असलेलं माझं कुटुंब 'दारिद्र्यरेषेखाली' या प्रवर्गात चपखल बसलं होतं.


जातीचा प्रश्न एखाद्या लोलकाच्या विविध मितींमधून पाहिला जातो. त्यामुळेच खरं तर भारतात अधिक चर्चा - संवाद करण्याची आवश्यकता असलेला 'जात' हा विषय अनेक गैरसमजुती आणि चुकीच्या धारणांनी वेढलेला आहे. 'जात' हा एक असा शब्द आहे, जो आरक्षण, दलित, आदिवासी, मानवी मैला, दलित भांडवलशाही, रोजंदारीने काम करणारे मजूर, क्रूर हिंसा, गुन्हेगारी, तुरुंगवास, राजपूत, ब्राह्मण, वाणी - बनिया , कायस्थ, ओबीसी अशा विविध शब्दांसाठी समानार्थी म्हणून विचारात घेतला जातो. जातीच्या नग्नतेच्या अशा अनेक रूपांना आपल्याला रोज सामोरं जावं लागतं. तरीही या सगळ्यामध्ये जात तिचं पावित्र्य बहुविध मार्गांनी जपते आणि मानवी जीवनाच्या प्रत्येक पैलूमधून आपला अजेंडा बळकट करत राहते ही बाब दुर्लक्षितच राहते. त्यावर चर्चाच केली जात नाही. सार्वजनिक आणि खासगी आयुष्याच्या विविध पैलूंमध्ये जात ज्याप्रकारे महत्त्वाची भूमिका निभावत असते, त्याची आपण कल्पनाही करू शकत नाही.

आमची शेतजमीन नव्हती आणि आमच्याकडे रंगीत टीव्ही, फ्रिजही नव्हता. वडीलही नोकरी करत नव्हते. (आयुष्यातला बराच मोठा काळ आजारपणामुळे ते अंथरुणाला खिळून होते.) त्यामुळे आमचं उत्पन्नही कमीच होतं. वडिलांच्या मालकीचं घर नव्हतं. वारसाहक्काने त्यांना मिळालेल्या जमिनीवर आम्ही राहत होतो. ३० बाय ४० फुटांची बास्केटबॉल कोर्टपेक्षाही निम्म्या आकाराची जमीन. या जमिनीची तीन कुटुंबांत समसमान वाटणी झाली होती. तिन्ही कुटुंबांची मिळून सोळा माणसं राहत होतो, त्यामुळे घरात स्वच्छतेच्या सोयी-सुविधांच्या नावानं बोंबच होती. एकच मोरी आणि संडास होता. सकाळच्या वेळेला आम्हा भावंडांची, चुलत

भावाबहिणींची शाळा साधारण एकाच वेळेला असायची, त्यामुळे संडासला, अंघोळीला जाण्यासाठी प्रत्येक जण रांगेत असायचा. घरात दहावीच्या पुढे कोणी शिकलेलं नव्हतं. आमचं छप्पर म्हणजे कच्च्या विटांवर तोलून धरलेले, गंजलेले, घळ्यांचे लोखंडी पत्रे. ते उडू नयेत म्हणून त्यावर दहा-वीस किलो वजनाचे मोठे दगड ठेवले जात. लोखंडी पत्र्यांतून वीज वाहते आणि पावसाळ्यात छपरावरचे दगड घसरून पडण्याचीही मोठी भीती होती. लोखंडी पत्र्यांमुळे हवामानात बदल होण्याचा अवकाश की, आम्हाला आधी चाहूल लागत असे. हे पत्रे आमच्यासाठी हवामानाचा अंदाज सांगणारे जिवंत स्रोत होते. बारीक थेंबांचा शिडकावा पाऊस येण्याची वर्दी द्यायचा. पत्र्यांमुळे त्या थेंबांचा जोरदार आवाज आम्हाला आधी कळायचा. उन्हाळ्याच्या दिवसांत कडक उन्हामुळे पत्रे असे तापायचे की खाली बसलेला माणूस गुदमरायचा, श्वास घेणंही मुश्कील व्हायचं. मजबूत आणि जाडजूड छपराअभावी थंडीच्या दिवसांतही त्रास व्हायचाच. तशा परिस्थितीत निर्दयी हवामानाचा सामना करत आम्ही त्या घरात झोपलो. लोखंडी पत्र्यांपासून कशीतरी आपली सुटका व्हावी, यासाठी आम्ही रोज प्रार्थना करायचो, चोवीस तास तोच विचार मनात असायचा. दुर्दैवानं ती प्रार्थना कधी फळाला आलीच नाही. आजोळी गेल्यावर मात्र सकाळी उठल्यावर, काल रात्रभर पाऊस पडून गेलाय हे कळायचंसुद्धा नाही. याचं मला आश्चर्य वाटायचं. आजोळच्या घराचं छप्पर जाडजूड आणि सिमेंटचं होतं, त्यामुळे पाऊस पडण्याचा आवाज ऐकू येत नसायचा. आमच्या घरी मात्र मुसळधार पावसाच्या आवाजाने रात्रभर झोप लागत नसे, अशी परिस्थिती होती.

त्यावेळी जगण्यासाठी मी मिळेल ते काम करत होतो. आई - वडिलांनी विरोध केला तरी त्या परिस्थितीतून मार्ग काढण्याकरता मी अधीर झालो होतो. एकदा मी बुटांच्या कारखान्यात कामाला जाण्याचा विचार केला. आमच्या वस्तीतला एक मित्र तिथे मजूर म्हणून काम करत होता. तसेच एकदा माझ्या आजोळच्या नातेवाइकांसोबत विदर्भातल्या एका बागायती पट्ट्यात भुईमुगाच्या शेतावर कामाला गेलो होतो. वडिलांच्या वर्तमानपत्रासाठीही मी व्यवस्थापक म्हणून काम केलं. ट्रक चालकासोबत क्लीनर म्हणून काम केलं. वखारीत काम केलं. हातातोंडाची गाठ पडावी, याकरता हे सगळे प्रयत्न केले होते. मिसरुड फुटायच्या आतच मी मिळतील ती जोखमीची सगळी कामं केली होती.

नवी संहिता... नवा आशय...




## बोल बच्चन

**रुपेश दुबे**


अनुवाद - **मंजुषा मुळे**

बॉलीवूडचा शहेनशाह बिग बी आणि त्याच्या जादुई आवाजानं अजरामर झालेले संवाद म्हणजे जणू भारतीयांसाठी अखंड प्रेरणेचा स्त्रोत... असेच अठरा लक्षवेधी 'बोलबच्चन' देत आहेत जगण्याचं बाळकडू

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

---

नवी संहिता... नवा आशय...





## मार्ग आत्मविश्वासाचा

**रॉस टेलर**

अनुवाद - **श्याम भुर्के**

गुरुकिल्ली आत्मविश्वासाची...
दारे उघडी प्रगतीची

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# सम्राज्ञी

## महाराणी व्हिक्टोरिया आणि भारत

■

**माइल्स टेलर**

अनुवाद : **वर्षा वेलणकर**

■

*भारतीय लढायांमधून लुटलेला माल असो, राणीच्या दरबारातील खास भारतीय सैनिक असोत वा तिच्या भेटीस गेलेले तत्कालीन राजेरजवाडे असोत, एकोणिसाव्या शतकातील सम्राज्ञी व्हिक्टोरियाच्या भारतासोबतच्या संबंधांची सोदाहरण मांडणी असणारं पुस्तक*

‘एम्प्रेस क्वीन व्हिक्टोरिया अँन्ड इंडिया’ या माइल्स टेलर यांच्या इंग्रजी कादंबरीचा वर्षा वेलणकर यांनी ‘सम्राज्ञी : महाराणी व्हिक्टोरिया आणि भारत’ हा मराठी अनुवाद केला आहे. एकोणिसाव्या शतकातील भारतासाठी राणी व्हिक्टोरिया एक अद्‌भुत, अपरिवर्तनीय आणि अतुलनीय उदाहरण होती. भारतीयांसाठी राणी लक्षवेधी व्यक्ती होती. राणीची मर्जी राखण्यासाठी तिच्या प्रति असलेली निष्ठा प्रकट करणाऱ्या गोष्टींमध्ये तिला उद्देशून केलेली भाषणे, भेटवस्तू आणि स्मारके यांचा समावेश होता. साधारण १८५८ ते १९०१ या काळात राणी व्हिक्टोरियाच्या आणि तिच्या कुटुंबीयांच्या संदर्भात अनेक चरित्रे, कवितासंग्रह व स्तुतिपर लेख प्रकाशित झाले. अधिकृतपणे १८५८ पासून भारताला राजघराण्याकडे सोपविण्यात आले, तेव्हापासून राणी व्हिक्टोरियाने तिला मिळालेल्या सम्राज्ञीपदाच्या उपाधीसह ब्रिटिश राज आणि भारत यांचे एक समीकरणच प्रस्थापित केले. *‘सम्राज्ञी ’* हे पुस्तक राणी व्हिक्टोरियावरील भारताच्या प्रभावाचा अभ्यास सांगणारे पुस्तक आहे. त्याच वेळी राणीचा, भारतीय राजकारणावर आणि सांस्कृतिक आयुष्यावर असलेला प्रभाव याचेही वर्णन करते. राणीने भारताला कधीच भेट दिली नाही. जरी अनेकानेक आणि वैविध्यपूर्ण भारतीयांनी तिच्या दरबारात हजेरी लावली, तरी तिच्या कार्यकाळातील भारत हा साधारणतः तिच्या कल्पनेतच स्थित होता, ज्याला आशिया खंडातील आणि तिच्या देशातील तिच्या माहितीस्रोतांनी कायम प्रवाहित ठेवले. भारतातील १८५७ व ५८ च्या बंडानंतर तिचा दृष्टिकोन संपूर्णतः बदलला, जे अनेक व्हिक्टोरियन नागरिकांबाबतही घडले. फरक एवढाच होता की, त्यानंतर राणी भारताप्रति आणि तेथील नागरिकांप्रति अधिक सहृदय तर झालीच; पण त्याहून अधिक सहिष्णू झाली. शिवाय इतर ब्रिटिशांच्या तुलनेत तिच्यातील स्वाभाविक वर्णद्वेषही कमी होत गेला. व्हाइसरॉय यांच्या अखत्यारीतील भारतीयांच्या ज्या तक्रारी किंवा विवाद होते, त्यात ती अगदी नकळत भारतीयांची बाजू घेऊ लागली. युवराज अल्बर्ट यांच्याशी तिचा विवाह झाल्यावर तिचे माहेराकडून जे हॅनोव्हेरियन संबंध होते, त्यामुळे ती युरोपातील अनेक छोट्या-छोट्या प्रोटेस्टंट न्यायसंस्थांशी जोडली गेली होती. राजदरबाराकडे प्रवाहित झालेल्या आणखी काही विशिष्ट धाराही होत्या - ज्यात लष्करी अधिकारी, चर्चचे लोक, नागरी सेवा अधिकारी, प्रवासी, तत्त्वज्ञ व भारतीय संस्थानिक यांचाही समावेश होता; जे अगदी इमानेइतबारे भारतातील घडामोडींच्या कथा राणीपर्यंत पोहोचविण्याचे काम करीत असत.

हे पुस्तक ब्रिटिशशासित भारतीय सरकारने राणीचे नाव आणि प्रसिद्धी यांचा जो वापर केला, त्यावरही वैचारिक प्रकाश टाकते. भारतातील १८५७ व ५८च्या उठावानंतर ही बंडखोरी शमविण्यासाठी व जनतेला आश्वस्त करण्यासाठी राजघराण्याने आपले संपूर्ण वर्चस्व पणाला लावले होते. सौम्यपणा, सोशीकता आणि समानता ही वचने देणारा मसुदा मंजूर झाल्यावर तो लगेच भारताचा 'मॅग्ना कार्टा' म्हणून लोकप्रियही झाला आणि राणीइतक्याच सन्मानाने त्याची दखल घेतली गेली. तसेच हे पुस्तक राणी व्हिक्टोरियाच्या भारतीय राजकीय संस्कृतीमधील विस्तारित प्रतिनिधित्वाचाही आलेख मांडणारे आहे. निव्वळ १८५८च्या तिच्या जाहीरनाम्यामुळे तिची भारतातील प्रतिमा कमालीची उंचावली गेली होती. टीकाकारांच्या लेखणीच्या कचाट्यात ती सापडली नाही. इतरांवर वर्चस्व गाजवणारे, त्यांना मंत्रमुग्ध करणारे तिचे फक्त एक रूप नव्हते. हिंदूंकरिता-ती त्यांची मुघलांपासून सुटका करणारी होती, तर मुस्लिमांसाठी ती अल्पसंख्याकांच्या अधिकारांची पुरस्कर्ती होती. ती आर्थिक आधुनिकीकरण आणि उदारमतवादी सुधारणा घडवून आणण्याच्या बाजूने होती. एक स्त्री म्हणून असलेला तिचा परिचय, विशेषतः १८६१ नंतर एक विधवा म्हणून ती एक असाधारण स्त्री आहे, या कल्पनेला आणखी बळ देणारी ठरली. स्त्रीशिक्षण, विधवांचे समाजातील स्थान, प्रतिष्ठा आणि विवाह परंपरांतील बदल, सुधारणा, *जनाना* (भारतीय स्त्रियांची राहण्याची जागा) या संदर्भातील विषय आणि काळजीवाहू सेवांचे प्रचार व प्रसार यांसाठीही राणीला आवाहन केले जात असे. या सर्व प्रकाराने १८८०पर्यंत राणी व्हिक्टोरियाला *'मदर ऑफ इंडिया'* म्हणजेच 'भारताची माता' हे गुणविशेषसुद्धा लावले जाऊ लागले. हे सारे काही राणीच्या एक दशकीय - १८८७ ते १८९७ - कार्यकाळात घडले, जो कालखंड भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या दशकीय वाटचालीचासुद्धा होता. १९०१ मध्ये राणीचा मृत्यू झाल्यानंतरदेखील तिचा पुत्र (सातवा एडवर्ड), नातू (जॉर्ज पंचम) आणि दोन पणतू (आठवा एडवर्ड व सहावा जॉर्ज) हेही यथावकाश भारताचे सम्राट म्हणून ओळखले गेले. तिचा आणखी एक पणतू - लुई माउंटबॅटन हाही भारताचा शेवटचा व्हाइसरॉय होता. राजेशाही ते ब्रिटनचे राजकारण आणि संस्कृती यांच्या एकोणिसाव्या शतकातील वाटचालीचा हा एक लेखाजोखा आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, आधुनिक भारताच्या निर्मितिप्रक्रियेतील एका हरवलेल्या अध्यायाची ही कथा आहे.

**नवी संहिता... नवा आशय...**

# एके दिवशी




## डॉ. गिरीश वालावलकर

उद्योगसमूह, राजकारण, गुन्हेगारी आणि आर्थिक अफरातफर यांचा परस्पर संबंध अलगद उलगडत श्रीधर, चारुलता, यशवंत या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मानवी स्वभावाचे पैलू स्पष्ट करणारी कादंबरी

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

---

**नवी संहिता... नवा आशय...**

# अराजक

## विल्यम डॅलरिंपल

अनुवाद - **रेश्मा कुलकर्णी-पाठारे**




हजारो मैल दूर असलेल्या कंपनीनं चार खोल्यांच्या कार्यालयातनं दोन लाख सैनिकांच्या बळावर भारतावर वर्चस्व गाजवलं. या वसाहतवादी गळचेपीत भारताची लूट केली. ईस्ट इंडिया कंपनीच्या या जुलमी कारकिर्दीचा सडेतोड विल्यम डॅलरिंपल यांनी घेतलेला धांडोळा.

**किंमत : ७९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**पुस्तक परिचय**




# कुलामामाच्या देशात

**जी. बी. देशमुख**

*मेळघाटच्या जंगलात रानवाटा तुडवत कुलामामाचं अर्थात वाघोबाचं दर्शन घेण्यासाठी करावी लागणारी जद्दोजहद, खुसखुशीत प्रसंग आणि पेचप्रसंग यांचं खुमासदार शैलीतील मनोरंजक कथन*

मेळघाटातील आदिवासींच्या कोरकू भाषेत वाघासाठी शब्द आहे, 'कुला' आणि आदिवासी बांधव मायेनं, त्यांना संबोधतात 'कुलामामा'! १९९१च्या उन्हाळ्यातील ही गोष्ट. नवीन क्षेत्रसंचालक रुजू होऊन तीन महिन्यांचा कालावधी उलटून गेला होता. त्यांना अद्याप जंगलाच्या राजानं अर्थात कुलामामानं दर्शन दिलं नव्हतं. रुजू होते वेळी कदाचित साहेबांना असं वाटलं असावं की, मेळघाटातील पूर्ण वनविभाग त्यांच्या दिमतीला असल्यामुळे व्याघ्रदर्शन ही त्यांच्यासाठी सहज होणारी घटना ठरेल; परंतु प्रत्यक्षात झालं ते विपरीत होतं. वाघोबा अजूनही त्यांच्यावर प्रसन्न झाले नव्हते. एके दिवशी ते उद्वेगानं म्हणाले, ''इतका मोठा माझा स्टाफ आहे; पण तुम्ही लोक मला तीन महिन्यांत एक वाघदेखील दाखवू शकला नाहीत.'

साहेबांची तक्रार खरी होती. सरकारी स्तरावर उत्तर देताना 'साहेब, तुमचं नशीब फुटकं आहे, त्याला आम्ही काय करावं?' असं खरखुरं उत्तर देता येत नव्हतं, म्हणून मी त्यांच्यासमोर वाघ न दिसण्याच्या शास्त्रशुद्ध आणि तर्कसंगत कारणांचा पाढा वाचला. डोंगराळ प्रदेश, कमी धारणक्षमता, एक-एका वाघाचा विस्तीर्ण इलाखा इ. इ. साहेबांनी त्यावर इतकीच प्रतिक्रिया दिली, ''ते सर्व ठीक. मी तुम्हाला अजून सात दिवस देतो. पुढचे सात दिवस हुकूम माझा नव्हे, तुमचा चालेल. तुम्ही म्हणाल तसं मी करतो. कुठं जायचं, कसं जायचं, हे सगळं तुम्ही ठरवा. रात्र असो की दिवस, वेळेचं बंधन नाही. मी तुमच्या मागे-मागे येईन; पण तुम्हाला मिशन यशस्वी करून दाखवावं लागेल, मला मेळघाटातील वाघ दाखवावा लागेल.''

प्रकरण हातघाईवर आलं होतं. साहेबांचं व्याघ्रदर्शन आता 'इज्जत का सवाल' झाला होता. संपूर्ण विचाराअंती मी रंगुबेली हे ठिकाण सुचवलं. मेळघाट व्याघ्रप्रकल्पातील रंगुबेली या ठिकाणानजीक खापरा नदी तापी नदीला जाऊन मिळते. त्या संगमाची समुद्र सपाटीपासून उंची सुमारे ३५० मीटर आहे. समुद्र सपाटीपासून ११७८ मीटर उंचीवर असलेलं वैराट हे मेळघाटातील सर्वांत उंच ठिकाण आहे. खापरा नदी तापीला भेटण्यापूर्वी अनेक वळणं घेते. कदाचित आपलं स्वतंत्र अस्तित्व गमावण्याची इच्छा नसल्यामुळे ती इतके आढेवेढे घेत असावी. जमिनीचा उतार कमी झाल्यानं नदीचं पात्र उपलब्ध उतारानुसार फिरत फिरत जातं, हे त्या आढ्यावेढ्यांच्या मागील शास्त्रीय कारण. तापी नदीच्या पात्रानजीक गाळाची सकस माती जमा

झालेली नजरेस पडते. कधी काळी बांबूचं बी नदीच्या पाण्यासोबत वाहत आलं आणि या दोनही नद्यांच्या काठांवर समान उंचीवर पसरलं असावं, ज्यामुळे सर्वत्र बांबूच्या दाट रांगा तयार झाल्या. बांबू इतका दाट की इतर वनस्पतींचं नामोनिशाण नाही. या दाट बांबूंच्या जंगलात गुरांचे दांड सोडल्यास रस्ते काढणं केवळ अशक्य. उंच दाट बांबूंच्या खालून भुयाराप्रमाणे तयार झालेल्या गुरांच्या दांडातून वाकत-वाकत चालणे हाच एकमेव पर्याय. घनदाट बांबूच्या जंगलाच्या आडोशाचा फायदा घेऊन तिथे सुमारे चार वाघांचं अस्तित्व असल्याची खात्रीपूर्वक माहिती होती. 'तुम्ही म्हणाल, तेथे जाऊ' असं म्हणणारे साहेब शब्दांस जागले. रंगुबेलीचं ठरलं.

सतत तीन दिवस रंगुबेली, कुटुंगा, कुंड, घोकडा, खामदाखेडा, किन्हीखेडा, राजकिल्ला, तसंच खापरा व तापी नदीच्या संगमानजीकचं उंच ठिकाण असलेलं मेळघाट क्षेत्र पिंजून काढलं.

सकाळी चार ते दहा नुसती भ्रमंती. दहा ते बारा कार्यालयीन काम. दुपारी बारा ते चार विश्रांती व चार ते रात्री आठपर्यंत पुन्हा वाघाच्या शोधकार्यात भटकंती, अशी जबरदस्त मोहीम सुरू होती. त्या क्षेत्रातील सर्व पाणवठे तुडवून झाले, चांदणी डोह, घोगरा अशा वाघाच्या अस्तित्वाचे पुरावे देणाऱ्या सर्व ठिकाणी भल्या पहाटे किंवा संध्याकाळी दोन ते तीन तास शांतपणे बसून वाघोबांची प्रतीक्षा केली. या सर्व जागी वाघ व अस्वलाच्या अस्तित्वाच्या ताज्या खुणा– विष्ठा, जमिनीवर नखांनी खुरपल्याच्या खुणा, बैठकीच्या खुणा – ते भोवताली असण्याची जाणीव करून देत होत्या; पण काही केल्या एकही वाघ दर्शन देण्यास राजी नव्हता. तीन दिवस अशी कठोर परीक्षा झाल्यानंतर साहेबांचा संयम सुटला. चवथ्या दिवशी साहेबांनी मनातलं बोलून दाखवलं. म्हणाले, ''रवी, तुझं आणि माझं सोबत जाणं लाभी दिसत नाही.''

...आणि त्या दिवशी सकाळच्या नाश्त्यानंतर आम्ही स्वतंत्रपणे दोन गटांत वेगवेगळ्या क्षेत्रात जाऊन वाघोबांचा शोध घ्यायचं ठरवलं. वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेत असताना जर मला वाघ दिसला, तरी साहेबांना दाखविण्यासाठी त्याला धरून ठेवता आला नसता, तेव्हा या धोरणाचं हशील काय, असे इंटेलिजंट प्रश्न साहेबांसमोर विचारायचे नसतात. हरिसालपर्यंत आम्ही सोबत गेलो, आणि पुढे ढाकणा-डोलार-कोकटू हे साहेबांच्या पसंतीचं क्षेत्र त्यांनी निवडलं आणि मी गेलो रायपूरला. दुपारी बाराच्या

सुमारास मी पोहोचलो रायपूरच्या विश्रामगृहात. वनरक्षक बेलसरेंची भेट झाली. मी त्यांना म्हटले, ''गेले चार दिवस सतत शोध घेऊनही साहेबांना आम्ही वाघ दाखवू शकलो नाही. शेवटी, साहेब गेले तिकडे आणि मी आलो इकडे. आता तुम्हीच मला वाघ दाखवा, बोला, वाघ दाखवू शकता काय?''

''अभी चलने का क्या? अभ्भीच दिखाता...'' बेलसरेंचा आत्मविश्वास दाद देण्यासारखा होता.

''कहाँ जाना पडेगा?'' मी.

''हल्दु तलई.'' बेलसरे म्हणाले.

''कितनी दूर?'' मी.

''बस पाच कि.मी.'' बेलसरेंचे उत्तर.

''कैसे जाना?'' मी.

''पैदल.'' बेलसरे.

बेलसरे स्वत: मेळघाटातील कोरकू या आदिवासी जमातीचे. बेलाच्या झाडावरून त्यांचं गोत्र ठरलं. याच प्रकारे या जमातीत 'सेमलकर', 'भिलावेकर', 'जामुनकर' अशी आडनावं अनुक्रमे सेमल, बिबाव व जांभूळ या झाडांच्या नावावर असलेल्या गोत्रांवरून तयार झालेली आढळतात. आदिवासींची मुळं जंगलाच्या अस्सलतेशी कशी जुळली आहेत, त्याचा हा एक नमुना.

भुकेच्या तडाख्यात बेसनासोबत चांगली दीड भाकरी हाणली. हात धुतले. कान आणि डोकं झाकत गमछा बांधला आणि बेलसरेंना म्हणालो, ''चलो.'' आणि आमचा दोन सदस्यीय चमू निघाला, हल्दू तलईकडे. पाच कि.मी. अंतर एका तासात पार केलं. रस्त्यात झाडं भरपूर होती; पण सगळी सागवानाची. त्यामुळे सावलीचा पत्ता नाही. मार्गात ओहोळ-नाले मुबलक; परंतु उन्हाळ्यामुळे सगळे कोरडे ठण्ण! 'तलई' म्हणजे दरीचा समतल खोलगट भाग. 'हल्दु तलई' म्हणजे जिथे हल्दु झाडांचं जास्त प्रमाण आहे अशा जंगलातून वाहत येणाऱ्या ओढ्यांचा शेवटी असणारा खोलगट समतल भाग. प्रत्यक्ष डोहापाशी पोहोचल्यावर आम्ही सतर्क होतो. डोह नजरेच्या टप्प्यात येताच आम्ही काळजीपूर्वक चालू लागलो होतो. डोहात पाणी होतं; पण आसपास वाघोबा नव्हते. पाच कि.मी.ची भर उन्हातील तंगडतोड निष्फळ ठरली होती; पण आता बेलसरेसुद्धा इरेस पेटले होते. ते म्हणाले,

''रुको साब, यहाँ से एक कि.मी. ऊपर गये तो, घोगरा है। पानी नही होता वहाँ, पर धूप के टाइम शेर वहाँ आकर बैठता है।'' 'घोगरा' म्हणजे खडकातील कपार. मी म्हटलं, ''चलो.'' मनात वाघ दिसण्याची शाश्वती नव्हतीच; पण मी नकार दिला नाही. आम्ही मुद्दामच घोगऱ्याच्या वरच्या बाजूनं जाण्याचा निर्णय घेतला. अत्यंत काळजीपूर्वक घोगऱ्याच्या दिशेनं आमची आगेकूच सुरू होती. वाघ असो की नसो, काळजी घेणं आवश्यक होतं. जराशी गफलत जिवावर बेतायची. म्हणून गुपचूप चालत असता आमचा संवादही खाणाखुणांतून सुरू होता.

◆


**नवी संहिता... नवा आशय...**

# आजचा दिवस माझा




**विजय अमृता कुलांगे**


**(IAS)**

काळाच्या मुशीत तावून सुलाखून प्राथमिक शिक्षक ते आयएएस अधिकारी असा प्रवास करणाऱ्या आयएएस विजय अमृता कुलांगे यांची जीवनजाणिवा समृद्ध करणारी यशोगाथा

**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**नवी संहिता... नवा आशय...**





## अरुंधती रॉय

अनुवाद - **प्रविण अक्कानवरू**

अधिकारशाही वृद्धिंगत होत असलेल्या या जगात स्वातंत्र्याचा अर्थ चाचपून पाहण्यासाठी आपल्याला उद्युक्त करणारे अरुंधती रॉय यांचे डोळ्यात अंजन घालणारे निबंध

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**नवी संहिता... नवा आशय...**




# बाईची गोष्ट

## प्रा. पुरुषोत्तम रा. रामदासी

कामवासनेची अनंत रूपं मांडणाऱ्या या शृंगारकथा, लैंगिकतेसंबंधीच्या मानसिक प्रदूषणावर प्रहार करणाऱ्या विलक्षण कथा

**किंमत : ३००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## **१६ एप्रिल, ते १५ मे २०२२ दरम्यानचा दिनविशेष**

### दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३० एप्रिल दरम्यान खास सवलत**

**१७ एप्रिल - शशिकांत वामन काळे यांचा जन्मदिन**
‘मगरडोह’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---

**१८ एप्रिल - मीरा सिरसमकर यांचा जन्मदिन**
‘हसाल तर वाचाल’, ‘खुलदाबादचा खजिना’, ‘नोबेल ललना भाग-१’, ‘नोबेल ललना भाग-२’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५१०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**१९ एप्रिल - पारू नाईक यांचा जन्मदिन**
‘मी का नाही ?’, ‘मोहिनी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३८०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**१९ एप्रिल - जिन ली लेथम यांचा जन्मदिन**
‘आगे बढो’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---

**२० एप्रिल - अजय पांडे यांचा जन्मदिन**
‘रेझोनान्स’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२० एप्रिल - सेबॅस्टिअन फॉक्स यांचा जन्मदिन**
‘डेव्हिल मे केअर’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**२० एप्रिल - झियाउद्दीन युसफझाई यांचा जन्मदिन**
‘लेट हर फ्लाय’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

---

**२१ एप्रिल - ज्ञानदा नाईक यांचा जन्मदिन**
‘तजेलदार कॅनव्हास’, ‘गोष्ट डॉट कॉम भाग १’, ‘गोष्ट डॉट कॉम भाग २’,

‘गोष्ट डॉट कॉम भाग ३’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८६०/- । सवलत किंमत ५३९/-**

**२१ एप्रिल - मार्क ट्वेन यांचा जन्मदिन**
‘हकलबेरी फिनची साहसं’, ‘टॉम सॉयरची साहसं’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७१५/- । सवलत किंमत ४५९/-**

**२१ एप्रिल - ॲलिस्टर मॅक्लीन यांचा जन्मदिन**
ॲलिस्टर मॅक्लीन यांच्या बारा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३५१०/- । सवलत किंमत १७७९/-**

**२२ एप्रिल - चेतन भगत यांचा जन्मदिन**
‘फाईव्ह पॉइंट समवन’, ‘द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ’, ‘वन नाईट @ द कॉल सेंटर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७२०/- । सवलत किंमत ४९९/-**

**२२ एप्रिल - डॉ. बाळ फोंडके यांचा जन्मदिन**
बाळ फोंडके यांच्या पंधरा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३२८५/- । सवलत किंमत १९८९/-**

**२३ एप्रिल - यशोधरा काटकर यांचा जन्मदिन**
‘बंजाऱ्याचे घर’, ‘थर्ड पर्सन’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३९०/- । सवलत किंमत १९९/-**

**२३ एप्रिल - जागतिक इंग्लिश भाषा दिन**
'EASY ENGLISH GRAMMAR AND COMPOSITION', 'A Methodical English Grammar', 'Fifty Essays'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७५५/- । सवलत किंमत ४६९/-**

**२४ एप्रिल - सचिन तेंडुलकर यांचा जन्मदिन**
‘प्लेइंग इट माय वे’, ‘चेस युअर ड्रीम्स’, ‘डेमोक्रसीज इलेव्हन’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १५३०/- । सवलत किंमत ९४९/-**

**२४ एप्रिल - कल्याणीरमण बेन्नूरवार यांचा जन्मदिन**
‘अग्निदिव्य’, ‘तरंग’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७४५/- । सवलत किंमत ४७९/-**

**२४ एप्रिल - विला कॅथर यांचा जन्मदिन**
‘देवाची माणसे’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-**

**२८ एप्रिल - ए. जी. कृष्णमूर्ती यांचा जन्मदिन**
‘धीरुभाईझम’, ‘असामान्य यशप्राप्तीसाठी दहा सामान्य सूत्रे’, ‘प्रतिकूलतेवर मात’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १५९/-**

**२९ एप्रिल - राजा रविवर्मा यांचा जन्मदिन**
‘राजा रविवर्मा’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २१९/-**

**३० एप्रिल - अरुण शेवते यांचा जन्मदिन**
‘चित्तचित्रे’, ‘मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी!’, ‘रंगल्या रात्री’, ‘रात्ररंग’, ‘साहेब संध्याकाळी भेटले...’, ‘स्वप्नी जे देखिले’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११८५/- । सवलत किंमत ६९९/-**

**३० एप्रिल - जॉन बायेन यांचा जन्मदिन**
‘द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**खालील संचांवर १मे ते १५ मे दरम्यान खास सवलत**

**४ मे - रॉबिन कुक यांचा जन्मदिन**
रॉबिन कुक यांच्या दहा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४१५/- । सवलत किंमत १७४९/-**

**४ मे - डॉ. एस. आर. देशपांडे यांचा जन्मदिन**
‘भारतीय शिल्पवैभव’, ‘भारतीय गणिका’, ‘मराठेशाहीतील मनस्विनी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५९०/- । सवलत किंमत ३२९/-**

**७ मे - रवींद्रनाथ टागोर यांचा जन्मदिन**
रवींद्रनाथ टागोर लिखित सात पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १०५०/- । सवलत किंमत ६४९/-**

**८ मे - ध्रुव भट्ट यांचा जन्मदिन**
ध्रुव भट्ट लिखित सात पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७९०/- । सवलत किंमत ११७९/-**

**८ मे - द. ता. भोसले यांचा जन्मदिन**
'ग्रामीण बोलीचा शब्दकोश' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ७९/-**

**११ मे - कल्पना कुलश्रेष्ठ यांचा जन्मदिन**
'इ.स.२५९५' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५९/-**

**१२ मे - मदर्स डे**
**संच १ :** 'चिकन सूप फॉर द मदर्स सोल भाग १,२,३', 'चिकन सूप फॉर द सोल : इंडियन मदर्स', 'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'करुणाष्टक'
**संचाची मूळ किंमत १११५/- । सवलत किंमत ७०९/-**
**संच २ :** 'रुचिरा भाग-१ व भाग-२', 'जिच्या हाती पाळण्याची दोरी'..., 'गर्भसंस्कार', 'एक सांगू?'
**संचाची मूळ किंमत १२३०/- । सवलत किंमत ७८९/-**
**संच ३ :** 'सुखद मातृत्व', 'सुखद बालसंगोपन', 'माय डॉटर माय मदर', 'माझ्या लाडक्या लेकींसाठी'
**संचाची मूळ किंमत ७७०/- । सवलत किंमत ४८९/-**
**संच ४ :** 'कळेल का 'त्याला' आईचं मन?', 'माझ्या अम्मीची गोष्ट', 'एका मातेचा लढा', 'कुंती' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १५३०/- । सवलत किंमत ९७९/-**

**१२ मे - डॉ. सुभाष दांडेकर यांचा जन्मदिन**
'चाळिशीनंतरची वाटचाल', 'वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन',

‘व्याधिमुक्त’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८५०/- । सवलत किंमत ५७९/-**

**१२ मे - सुप्रिया वकील यांचा जन्मदिन**
‘हाऊज दॅट!’, ‘पॉपकॉर्न’, ‘उत्सव’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २७९/-**

**१३ मे - आर. के नारायण यांचा जन्मदिन**
‘हलवाई’, ‘वडाच्या झाडाखाली आणि इतर कथा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १८१०/- । सवलत किंमत १२१५/-**

**१३ मे - डॅफने द्यू मोरियेर यांचा जन्मदिन**
‘जमेका इन’, ‘माय कझिन रेशेल’, या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २९९/-**

**१४ मे - संभाजी महाराज जयंती**
‘संभाजी’, ‘छ. संभाजी : एक चिकित्सा’, ‘छावा’ (नाटक) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८७०/- । सवलत किंमत ६०९/-**

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**
**website : www.mehtapublishinghouse.com**
**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा**
**या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com**

२३
एप्रिल

# जागतिक पुस्तक दिन

सहर्ष शुभेच्छा !!!

## आमच्या सर्व पुस्तकांवर

# ४०% सवलत

किमान ₹३०००
(नेट ₹१८००)च्या खरेदीवर
(एका पुस्तकाची एक प्रत)

ऑफर दि. २१ ते २८ एप्रिल

९४२०५९४६६५ | G Pay +91 94223 23039

**मेहता पब्लिशिंग हाऊस | मेहता बुक सेलर्स**

sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/04/2022 Posting Date : 11/04/2022

# नवीन संहिता... नवा आशय...






















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,